# आनंदलहरी

श्री दत्तमहाराज कवीश्वर यांची प्रवचने

भाग –७

# आनंदलहरी

श्री दत्तमहाराज कवीश्वर

यांची

प्रवचने

भाग – ७

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

प्रकाशन दिवस
(ज्येष्ठ शु. १२ शके १९३०)
रविवार, दि. १५ जून २००८

मुखपृष्ठ
आमोद दामले

मुद्रक
रमा एन्टरप्राईझेस
३९, स्वामी समर्थ नगर,
बंडू गोखले पथ, गिरगांव, मुंबई ४०० ००४.
दूरध्वनी : २३८५ २८४६
भ्रमणध्वनी : ९३२३२९१०३४

प्रकाशक
श्री दत्त आश्रम संस्थान
प. पू. श्री दत्त महाराज कवीश्वर मार्ग,
सद्गुरु नगर, प्रशांती नगर समोर,
जालना - ४३१ २०३.
दूरध्वनी : ०२४८२ २३६८०५

॥ श्री गुरुचरणारविंदाभ्यां नमः ॥

*मालाकमंडलुरधः करपद्मयुग्मे ।*
*मध्यस्थपाणियुगुले डमरुत्रिशूले ।*
*यस्यस्त ऊर्ध्वकरयोः शुभशंखचक्रे ।*
*वंदेतमत्रिवरदं भुजषट्कयुक्तम् ॥*

# 'श्रीदत्तात्रेयापराधक्षमापनस्तोत्रम्'

*रसज्ञा वशा तारकं स्वादु लभ्यं गृहीतं कदाचिन्न ते नाम दत्त ।*
*क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं प्रभो क्लिन्नचित्त ॥*

मनुष्यजन्म प्राप्त झाल्यानंतर भगवंताचे नामस्मरण घडले पाहिजे आणि ते घडले नाही या अपराधाची आपण क्षमा करावी अशी प्रार्थना महाराज या स्तोत्रामध्ये करताहेत. नामाचे महत्त्व त्यांनी आधीच्या श्लोकात सांगितले. वाणीने नामस्मरण करता येते. मनाचा निश्चय असेल तर ते अखंडही करता येते. सर्व संत महात्म्यांनी अखंड नामस्मरण करुनच आपला दुरितक्षय करुन घेऊन ते मुक्त झाले.

व्यवहारामध्ये वाणीने आपल्याला कांही बोलता येत नाही असं नाही. आपल्या ताब्यामध्ये रसज्ञा आहे. जन्ममरण परंपरा अखंड चालू आहे. कर्म करायचं आणि जन्माला यायचं. त्यातून तारणारं हे नाम आहे. म्हणजे त्यात किती सामर्थ्य आहे हे सांगितले महाराजांनी. दुसरे महत्त्व सांगितले की ते स्वादु आहे. अत्यंत मधुर आणि हितकर आहे. परीक्षितराजाच्या उदाहरणावरुन आपल्याला हे समजून येते. शुकाचार्यांसारखे ब्रह्मज्ञानी महात्मे स्वतः होऊन

त्याला उपदेश करण्याकरता आपण होऊन त्याच्या जवळ आलेले आहेत. प्रथम आपल्याला सातव्या दिवशी मृत्यु येणार या भीतीने राजा निराश झाला होता. पण भगवंताची योजना अशी की शुकाचार्य आपण होऊन त्याच्याकडे आले आणि संपूर्ण भागवत् त्यांनी राजाला सांगितले.

ते चरित्र अमृतासारखे आहे या भूमिकेतून राजाने ऐकल्यामुळे त्याचा प्राणमयकोषाचा अध्यास दूर झाला. ज्या वेळेला प्राणमयकोषापासून मी वेगळा आहे असं जेव्हां जीवाला समजतं त्या वेळी तहान, भूकेचा संबंध सुटतो. आपल्याला आपण या पंचकोषांपेक्षा वेगळे आहोत हे खरं ज्ञान झालं तर सुखदु:खाचा संबंध दूर होतो.

नामाचे तिसरे महात्म्य महाराज सांगतात की ते 'लभ्यं' आहे. कोण सांगणार आम्हाला नांव? नाम कुणी तरी सांगितलं पाहिजे, त्याचा उपदेश केला पाहिजे. भगवंताने विश्व निर्माण केले आणि सर्व जीवांच्या कल्याणाकरता कृतकृत्य झालेल्या महात्म्यांना ''जीवांचा उद्धार'' करण्याची प्रेरणा दिली. ''गुरु कर्ण धारम्'' अशी व्यवस्था केलेली आहे म्हणतात भगवान्. भवसमुद्र पार करुन नेणारे ते नावाडी आहेत. तेव्हां त्यांच्याकडून नाम मिळणार आहे. ज्यांचे अखंड नामस्मरण चालू आहे, ज्यांना नामस्मरणाची फलसिद्धी मिळालेली आहे; जे कृतकृत्य झाले आहेत अशा महात्म्यांच्या मुखातून जर नामाचा उपदेश ऐकायला मिळाला तर तो महत्त्वाचा आहे. त्याप्रमाणे 'लभ्यं' आहे म्हणतात. लभ्य म्हणजे मिळणारे नांव आहे.

महात्मे आहेत जगामध्ये. ईश्वराच्या प्रेरणेने सांगताहेत. इतकेच नव्हे तर प्रत्यक्ष त्यांनी जरी सांगितले नाही तरीसुद्धा ते नाव मिळतं.

कबीरांची कथा सांगतात. रामानंदाकडे जाऊन कबीरांनी नामाचा उपदेश करण्याची प्रार्थना केली. रामानंद म्हणाले, ''तूं मुसलमान आहेस तुला कांही मी नांव सांगू शकत नाही.'' कबीर बिचारे निराश होऊन घाटावर तसेच बसले. काय करणार? एवढ्यात रामानंद घाटावर स्नानाला जाताना कबीरांना त्यांचा पाय लागला. रामांनदाच्या तोंडातून ''राम, राम'' बाहेर पडले. झालं. कबीरांनी तोच उपदेश मानला आणि नाम घेण्यास सुरवात केली. म्हणजे नाम सांगितलं पाहिजेच असं नाही. ते अशा तऱ्हेने जरी 'लभ्यं' झाले तरी ते घेणाऱ्या जीवाचा उद्धार होतो. पुढे त्या नामस्मरणाने पुष्कळ लोक कबीरजींच्या मागे लागले. कबीरजी त्यांना म्हणाले,

***कबीर कबीर क्या कहते हो।***
***जाओ जमुना के तीर।***
***एक एक गोपीके प्रेम में।***
***बहे गये कोटी कबीर।***

कबीरजी म्हणाले, ''माझ्याजवळ काय आहे? मी पुण्यवान नाही. यमुनेच्या तीरावर जाऊन त्या गोपींचे दर्शन घ्या.'' तशी उत्कंठा, तळमळ जर मनामध्ये असेल तर गोपींचे दर्शन आजही होऊ शकते. त्या गोपींच्या मनातले भगवंताबद्दल किती प्रेम आहे हे जाणणारे कबीरजी आहेत. म्हणून ते सांगताहेत, माझ्यासारखे कोट्यावधी कबीर त्या गोपींच्या प्रेमात वाहून जातील इतके प्रेम त्यांना भगवंतानी दिले. हा अधिकार कबीरजींना सहज मिळालेला आहे. चुकून मिळालेल्या नामानेसुद्धा त्यांचे कल्याण झालेलं आहे.

वाल्मिकी महर्षींची अवस्था याही पूर्वीची होती. सुरवातीला ते वाटमारी करणारे कोळी होते. पण महात्मे भेटले, उपदेश केला आणि

त्यांना पश्चाताप झाला. पण त्यांना राम, राम म्हणताच येईना. त्यांच्या हातून इतकं पाप, इतक्या हत्त्या घडल्या होत्या की ते मरा, मराच म्हणायला लागले. परंतु श्रद्धा आहे. गुरुमहाराजांनी सांगितलेल्या मंत्राचा जप मरा, मरा उलटा जरी झाला तरी त्याचे पर्यवसान राम, राम म्हणण्यात झाले. अस हे लभ्य आहे. कुठून तरी मिळतं नाम आणि कल्याण होऊन जातं. हे नामाचं महत्त्व महाराजांनी दाखिवलं आहे.

***गृहीतं कदाचिन्न ते नाम दत्त।***

महाराज म्हणतात. आपले नाम केव्हांही माझ्या मुखातून आले नाही हा केवढा अपराध आहे !

जीवाला त्याच्या पूर्व कर्मानुसार सुखदु:खाची फळं देण्याचे काम देवाचे चालले आहे. पण त्यातूनही त्याच्या उद्धाराची व्यवस्था देवाने करुन ठेवली आहे. नामस्मरणाने आपला उद्धार होणार आहे अशी तळमळ असली तर उपयोग होतो. दोन तारा असल्यावरच वीज प्रगट होते. अंत:करणही तितके तळमळीने युक्त पाहिजे. आणि भगवंताचं नाम तर स्वयंसमर्थ आहे. इतकी व्यवस्था भगवंतांनी करुन ठेवली असतानासुद्धा माझ्या मुखातून आपले नाम कांही घेणं झालं नाही याबद्दल आपण क्षमा करा.

सर्व लोकांच्या कल्याणाकरता, मार्गदर्शनाकरता हे स्तोत्र केले आहे. नाही तर त्यांना स्वत:ला त्याची काय आवश्यकता होती? त्यांनी काय अखंड नामस्मरण केले नाही असं थोडच आहे ! पण सामान्य जीवांना अशी तळमळ लागली पाहिजे की आपण चुकलो; आपण किती आयुष्य फुकट घालवले, घालवत आहोत; त्यापेक्षा भगवंताचे नाम जर आपण घेतलं असतं तर किती कल्याण आपलं

झालं असतं. पण देवा हे नाम कांही आमच्या मुखातून आले नाही.

वाणी आपली आपल्या स्वाधीन आहे. आपण बोलत नाही किंवा आपल्याला बोलता येत नाही असे नाही. आणि नामही संसार तरुन जायला समर्थ आहे, अत्यंत मधूर आहे. नामस्मरणात रंगून गेल्यावर समाधी अवस्था प्राप्त होते.

मोरया गोसावींचे एक चरित्र प्रसिद्ध आहे. त्यांचा जन्म मोरगांवला झाला. त्यांच्या गुरुंनी त्यांना येऊरच्या चिंतामणिंच्या दर्शनाला जाण्यास सांगितले. मोरया गोसावी चालत निघाले. मयुरेश्वराचे अखंड नामस्मरण करीत चाललेले आहेत. रस्त्यात एक मोठा भुजंग आला आणि त्याने मोरया गोसावींना दंश केला. पण ह्यांना त्याचे भानच नाहीये. तसेच पुढे गेले. नामसमाधीत निमग्न असल्या कारणाने त्या भुजंगाच्या विषाचा त्यांच्यावर कांहीही परीणाम झाला नाही. येऊरला जाऊन उपासना केली. भगवंताच्या कृपेने कृतार्थता मिळाली, सगळं झालं.

महाराज क्षमा मागताना म्हणतात. मी आपण नामस्मरणासारखे सोपे साधन देऊनसुद्धा त्याचा उपयोग करुन घेण्याची बुद्धी मला झाली नाही. व्यवहारासाठीच बुद्धी, वाणीचा, इंद्रियांचा उपयोग केला. हे असं कसं झालं? ईश्वराचे नाम स्मरण करण्याचा विचार मनामध्ये आला नाही हे खरयं, परंतु आपण समर्थ आहात. समजून घेणारे आहात. क्षमा करणारे आहात म्हणून क्षमा मागितली. आपले अंत:करण दयार्द्र आहे, दयाळु आहे.

जीवन्मुक्त, ईश्वरी साक्षात्कार झालेले महात्मे कधीही कोणाचा द्वेष करीत नाहीत. सदैव सर्वांचे कल्याण व्हावे असेच चिंतन करतात. साधकाच्या हातून कितीही झाले तरी आपण दयाळु असल्याने

क्षमा करता, म्हणून ही प्रार्थना केली.

पुढच्या श्लोकांमध्ये आमच्या हातून काय काय अपराध घडले याचे वर्णन महाराज करताहेत.

***वियोन्यंतरे दैवदार्ढ्याद्विभो प्राग्गृहितं कदाचिन्न ते नाम दत्त।***
***क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं प्रभो क्लिन्नचित्त।।***

मानवयोनी, पशुयोनी, देवयोनी अशा अनेक योनी आहे. पशुयोनीत तर ज्ञानच नाही. देव म्हणजे काय? त्याच्या नामाचे महत्त्व काय? वगैरे कल्पना नाही. देवयोनीमध्येही तशीच थोडीशी स्थिती आहे. त्या योनींमध्येही माझ्या हातून नामस्मरण झाले नाही त्या बद्दलही क्षमा मागितली आहे.

मानवजन्मात आपल्या तारक नामाचे स्मरण माझ्या हातून घडले नाही त्या बद्दल आपण क्षमा करावी अशी प्रार्थना केली. त्याच्या नंतर पुढे मानवजन्माच्या विरुद्ध असणाऱ्या दुसऱ्या ज्या योनी आहेत त्यातही मला जन्म घ्यावा लागला असेल. पशुयोनी आहेत. देवयोनी आहे. त्या दोन्हीही योनीमध्ये जन्म घेतला असता तिथेही आणखी नामस्मरण झाले नाही. पशुजन्म प्राप्त झालेला असताना अत्यंत अज्ञान आहे. ईश्वर स्वरुपाची कल्पनाही त्या ठिकाणी नाहीये. आहार, निद्रा, भय, वगैरे विकार पशुंच्या ठिकाणी आहेत. त्यांना ज्ञानशक्ती नसल्याने त्यांच्याकडून नामस्मरण होत नाही. त्यातही पुण्यकर्म करुन पशुयोनीत आलेले जे आहेत ते त्या ठिकाणी सुद्धा नामस्मरण करु शकतात. या संदर्भात गजेंद्राचे मुख्य उदाहरण आहे.

गजेंद्र पूर्वीचा राजा होता. मोठा भगवत् भक्त होता. अगस्ती ऋषींच्या शापामुळे तो गजयोनीला गेला. पण त्याही जन्मात

भगवंताचे स्मरण त्याला घडले. असे अपवाद आहेत. गजेंद्रस्तुती अत्यंत उत्कृष्ट आहे. त्यात सगुणाचे थोडेही वर्णन नाही.

*ओम नमो मूलप्रकृतये अजिताय महात्मनै ।*
*अनाश्रिताय देवाय नि:स्पृहाय नमोऽस्तुते ।*

इथून सुरवात आहे. भगवंताला मी नमस्कार करतो. ज्याच्यामुळे हे संपूर्ण विश्व चैतन्यमय झालेले आहे कार्यकारी झालेलं आहे. अशा चैतन्यरुप परमात्म्याला माझा नमस्कार. त्याने जरी सगुणाचा विचार केला नाही तरी साक्षात्कार मात्र सगुणाचा झाला. सगुणानेच (सगुणरुपधारी ईश्वरानेच) त्याला मुक्त केले. म्हणजे गजयोनीत जन्माला येऊनही इतका अधिकार होता. भगवंताची स्तुती करुन तो मुक्त झाला.

दुसरे उदाहरण भरत राजाचे आहे. भरतराजा हरणाच्या पाशात सांपडला. ह्या अनाथ हरिणाला आई बाप नाही. माझ्या शिवाय कोणी नाही ह्या बुद्धीने त्या हरिणाचे संरक्षण करण्यातच त्याचा काल गेला. वास्तविक ईश्वर भजन करण्याकरता राज्याचा त्याग करुन आला असतानासुद्धा या हरिणाच्या पाशात तो अडकला आणि पुढच्या जन्मी तो स्वत:च हरिण झाला. परंतु त्याला आपण पूर्वजन्मात कोण होतो. आपला काय अपराध घडला. आपण हरिणाच्या जन्माला कां आलो हे त्याला कळलेले आहे. म्हणून या हरिणाच्या जन्मात सुरवातीपासूनच तो असंग राहिला. भगवंताचं स्मरण आरंभापासून त्याने केलं. म्हणजे हरिणाचा जन्म प्राप्त होऊन सुद्धा भगवंतांचे त्याला विस्मरण झाले नाही. परंतु सर्व साधारण पशु जन्मामध्ये ज्ञानशक्ती नसते. त्यामुळे एक अपराध घडला हाही अर्थ या ठिकाणी दिसतो.

तसेच देवयोनीमध्येही नामस्मरण घडत नाही. असे महाराज सांगताहेत. कारण काय? अत्यंत सुख आहे. शास्त्रकार सांगतात स्वर्गलोकात दु:ख अजिबात नाही. केवळ सुखं आहे. सुखाची सर्व साधनं तिथे आहेत. ज्या सुखाची इच्छा होईल ते सुख प्राप्त होते. त्यासाठी प्रयत्न करण्याची गरज नाही. पण मग अशा सुखांमध्ये मन गुंतून राहाणार नाही तर काय होणार?

*दु:खेष्वनुद्विग्नमन: सुखेषु विगतस्पृह: ।*
*वीतरागभयक्रोध: स्थितधीर्मुनिरुच्यते ॥२.५६॥*

स्थितप्रज्ञाच्या लक्षणांपैकी एक लक्षण भगवंतांनी अर्जुनाला सांगितले आहे. दु:खं कितीही प्राप्त झाली तरी मनाला उद्वेग नाहीये. क्लेश नाहीयेत. दु:ख येताहेत जाताहेत. चाललय आपलं.

त्याच्या उलट सुख प्राप्त झाली तरीसुद्धा 'सुखेषु विगतस्पृह:।' जसजशी सुख मिळत जातात तस तशी त्या सुखांची इच्छा वाढत जाते. पुण्यकर्मांमुळे इंद्रलोकांत जरी जाता आलं तरी सर्व सुखं तिथे मिळत असल्याने 'सुखेषु विगतस्पृह:' ही भावना होणे कठीण आहे.

उपनिषदामध्ये एकापेक्षा एक अधिक अशा आनंदाचे वर्णन आहे. सुख भोगावयाच्या वेळेला त्याच्याबद्दल इच्छा राहू नये. दु:ख जसं उद्वेग न करता भोगून संपलं तसं सुखही संपणारच आहे. त्यामुळे विचारी महात्मे अधिकाधिक सुख मिळविण्याचा प्रयत्न करत नाहीत. जीवमुक्त, स्थितप्रज्ञ महापुरुष सुखदु:खाच्या समस्थितीचा अनुभव घेत असतो.

परंतु सर्व सामान्य जीवात्मे जे आहेत त्यांच्या मनांत अनंत वासना आहेत. अधिकाधिक वासना उत्पन्न होताहेत. आणि त्यामुळे

आपले आयुष्य किती संपले. कशात आपला काल गेला, अजून किती आयुष्य शिल्लक आहे याकडे आपले लक्ष जात नाही. जर ईश्वराची कांही उपासना झाली तर मानवजन्माची कृतार्थता प्राप्त होईल. पण आपल्याला तशी इच्छाच उत्पन्न होत नाही.

***वियोन्यंतरे दैवदाढ्यद्विभो प्राग्गृहितं कदाचिन्न ते नाम दत्त।***
***क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं प्रभो क्लिन्नचित्त॥***

महाराज म्हणतात यालाही दैव कारण आहे. दैव इतकं प्रबळ आहे की या दैवाच्या योगाने पशुजन्मातही नामस्मरण घडत नाही. देवयोनीतही घडले नाही हा मोठा अपराध माझ्याकडून झाला आहे. ज्ञान साधनं असताना त्या प्रमाणे न वागणं हा मोठा विशेष आणि बुद्धीपूर्वक केलेला अपराध आहे म्हणून त्या बद्दलही क्षमा मागितली आहे. अमूक जन्म झाला म्हणजे नामस्मरण उपासना घडते असे कांही नाही.

भगवंतानी अर्जुनाला सांगितले -

***शुचिनांश्रीमतां गेहे योगभ्रष्टोभिजायते***

साधनाभ्यास, योगाभ्यास चालू असताना आयुष्य संपलं तरी तो अभ्यास फुकट जात नाही. बुद्धीवर झालेले संस्कार पुढच्या जन्मात आपल्या बरोबर येतात आणि पवित्र आचरण करण्याऱ्या, उत्तम बुद्धी ज्यांना आहे अशा कर्मयोग्याच्या कुलामध्ये जन्म येतो. मग लहानपणापासून त्याच्या बुद्धीवर आपोआप चांगले संस्कार होऊ शकतात आणि ती अधिकाधिक कार्यक्षम होऊन त्या जीवाच्या हातून उत्तम उपासना होऊ शकते. परंतु सर्व सामान्य जीवांची ही स्थिती नाहीये. देवलोकात जाऊनही कांही ईश्वराची उपासना घडत नाही. त्याच्यावर अनेक प्रसंग येतात. कारण दैत्यसुद्धा प्रयत्नवादी

आहेत. नास्तिक असतील कदाचित परंतु आपले कल्याण करुन घेण्यासाठी ईश्वराची उपासना मात्र कितीही कष्ट पडले तरी करतात आणि इष्ट वर प्राप्त करुन घेतात. आणि देवांना त्यांच्या स्थानातून भ्रष्ट करतात. म्हणजे पुण्यकर्मांने स्थान मिळाले तरी ते कायम टिकणारे नाही. दैत्यांची देवांना कायम भीती आहे. भीतीमुळे मनुष्याची कदाचित ईश्वर स्मरणाकडे प्रवृत्ती होते. तर सर्व सामान्य सुखावस्था चालू असताना, उपभोग मिळत असताना ईश्वराची उपासना घडणे अत्यंत कठीण आहे. म्हणून महाराजांनी तोही एक अपराध सांगितला आहे. देवयोनीमध्ये जाऊन ईश्वराचे नामस्मरण न घडणे यालाही दैव कारण आहे असे ते म्हणतात. हे दैव इतके बलवत्तर आहे.

नामस्मरण न घडणे हाच मोठा अपराध या स्तोत्रामध्ये बऱ्याच श्लोकांमध्ये महाराजांनी सांगितला आहे.

***मया मातृगर्भस्थितीप्राप्तकष्टाद् गृहीतं कदाचिन्न ते नाम दत्त।***
***क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं प्रभो क्लिन्नचित्त॥***

मानवजन्म प्राप्त होताना गर्भवास अपरिहार्य आहे. मातेच्या गर्भात जीवात्मा कसा प्रवेश करतो. त्याचे पालनपोषण कसे होते? कोण करतो? ह्या सगळ्या अचिंत्य गोष्टी आहेत. ईश्वराच्या आस्तिक्याबद्दल तो एक मोठा पुरावा आहे. संत महात्म्यांच्या दृष्टीसमोर हा तर्क आहे - गर्भावस्थेत आणि जन्माला आल्यावरसुद्धा आपले रक्षण करणारा ईश्वर आहे. वैद्य असो डॉक्टर असो गर्भावस्थेत कोणीही रक्षण करु शकत नाही. जो गर्भावस्थेत संरक्षण करतो तो बाहेर संरक्षण करणार नाही असं कसं म्हणायचं; म्हणून ईश्वराबद्दल आस्तिक्य बुद्धी त्यांच्या अंत:करणामध्ये अत्यंत

दृढ झालेली आहे. गर्भामध्ये असताना दु:खाचा अनुभव आहे. गर्भावस्थेत असताना माझ्या हातून नामस्मरण घडले नाही या अपराधाची क्षमा मागितली आहे. मातेच्या गर्भामध्ये मला राहावे लागले. सगळ्यांचा कांही अयोनिज संभव नसतो. द्रौपदी यज्ञकुंडातून उत्पन्न झाली होती तिच्यासारख्यांना गर्भवास नसणार. बाकीच्या सगळ्यांना नऊ महिने गर्भवासाचे कष्ट सहन करावे लागतात. पण त्या गर्भवासातसुद्धा तो सुरक्षित राहावा. त्याची वाढ व्हावी म्हणून अन्न पाणी मिळण्याची योजना ईश्वराने केली आहे. हा एक मोठा विचार आहे.

सातव्या महिन्यापासून गर्भाला आपण कोणच्या पापामुळे या स्थितीत आलो याचे ज्ञान होते म्हणतात. तो जीवात्मा त्या गर्भावस्थेत देवाला सांगतो ''मला इथच ठेवा तुम्ही. तुमची आठवण नेहमी मला या ठिकाणी होऊं दे. माझी कर्म संपून जाऊं देत.'' परंतु गर्भावस्था संपल्यावर तो जीव जन्माला येतो आणि पुन्हा मोहात सांपडतो. एखाद्या जीवावर सद्गुरुंची कृपा होऊन त्याला गर्भावस्थेत जर दृढ ज्ञान झाल तर जन्माला आल्यावरही ते दृढ राहातं. त्या ज्ञान प्रभावाने त्याला मोह वगैरे कांही होत नाही.

सद्गुरू नृसिंहसरस्वती स्वामी महाराज जन्माला आल्यानंतर ओंकाराचा उच्चार करायला लागले असे म्हणतात. नामधारकांनी तसे लिहून ठेवले आहे. तर या प्रमाणे एखादे आहेत. परंतु महाराजांनी सर्व सामान्य प्रार्थना केली आहे की तोही माझा अपराध झाला आहे. त्याही अपराधाची आपण क्षमा करावी.

दोषांची जाणीव निर्माण होणं हा एक मोठा गुण आहे. त्यालाच पश्चाताप म्हणतात. त्या पश्चातापातून हे स्तोत्र झालेले आहे. किंवा

ह्याचे पठण करायचे झाले तर पश्चातापाच्या भावनेने करावे असे मोठे महाराज सांगताहेत.

***मया मातृगर्भस्थितीप्राप्तकष्टाद् गृहीतं कदाचिन्न ते नाम दत्त।***
***क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं प्रभो क्लिन्नचित्त॥***

जीवात्म्यावर जर ईश्वरी प्रसाद झाला तर त्याला आपल्या पूर्व कर्मांबद्दल पश्चाताप होतो आणि तो त्या बद्दल ईश्वराजवळ क्षमा याचना करतो. मनापासून पश्चाताप होऊन केलेल्या क्षमा याचनेने सुद्धा पातकांचा नाश होतो.

संतांचा स्वभाव क्षमाशील असतो. जीवाने नम्रतेने पश्चाताप व्यक्त केला. क्षमा मागितली तरी ते त्याच्या सर्व अपराधांबद्दल क्षमा करतात. अपराध दूर होतो. मानव जन्मामध्ये नामस्मरण घडले नाही हा अपराध आहे. भगवंतानी सांगून ठेवले आहे - हजारो माणसांमध्ये कुणी तरी एखादाच प्रयत्न करतो. वस्तुत: देवाचा जन्म मिळाल्यावर नामस्मरण घडलं पाहिजे. ज्या ईश्वराच्या कृपाप्रसादाने आपण इथे येऊन पोहोचलों याचा विसर पडू नये. पण स्वर्गसुखातच मन मोहून जातं. रमतं आणि ईश्वराचा विसर पडतो.

सुभाषितकार सांगतात ब्रह्मदेवांनी दोन पदार्थांबद्दल मोह निर्माण केलेला आहे - कनक आणि कांता. देवदैत्यांनी समुद्र मंथन केले आणि धन्वंतरी अमृतकुंभ घेऊन वर आले. तो कुंभ दैत्य घेऊन गेले. देव निराश झाले. अशा वेळेला विष्णुंनी मोहिनीरुप घेऊन दैत्यांना मोहात पाडले आणि तो कुंभ परत आणला. कामिनी दृष्टीस पडताच एवढ्या प्रयत्नांनी मिळवलेला अमृतकुंभ दैत्यांनी देऊन टाकला. दिला. आणि तिलाच वाटणी करण्यास सांगितले. ब्रह्मदेवाने सृष्टी निर्माण करुन हा मोह उत्पन्न केलेला आहे. ज्याच्या

मनामध्ये हे दोन मोह नाहीत तो साक्षात शंकररूप आहे. महादेव आहे.

तर देवयोनीमध्ये जन्म आला. चांगली परिस्थिती आहे. कांहीही चिंता नाही. कोणचेही सुख प्राप्त होते आहे पण अशा वेळेला ईश्वराचे स्मरण आणखी घडत नाही. त्या बद्दलही पश्चाताप झाला पाहिजे. दुसऱ्याला दोष देत नाही हा साधक किंवा भक्त. मीच. देवही कदाचित झालो असेन. पापकर्मामुळे पशुही झालो असेन. पण त्या दोन्ही वेळेला माझ्या हातून नामस्मरण मात्र घडलेले नाही. पशुयोनीत तर अज्ञानच आहे. देवयोनीत ज्ञान जरी असले तरी मोहरुपी तमोगुणाने ते ज्ञान झांकले गेले आहे. मग मनुष्य जन्म. त्यात क्रमाक्रमाने गर्भावस्था, बाल्यावस्था, तरुणावस्था, आणि वृद्धावस्था. या सर्वही अवस्थेत नामस्मरण झाले नाही याबद्दल पश्चाताप व्यक्त केला आहे.

स्वेच्छेने कोणी गर्भवास पत्करत नाही. पण कर्मामुळे तो प्राप्त होतो. स्वेदज, अंडज, जरायुज आणि उद्‌भीज असे चार प्रकारचे जीव आहेत.

डास मच्छर वगैरे जीव स्वेदज आहेत. पक्षी वगैरे अंडज आहेत. अंड्यामध्ये एकदा जन्म आणि अंड्यातून बाहेर पडल्यावर दुसरा जन्म.

जरायुज म्हणजे गर्भाशयात जन्म घेऊन बाहेर पडणारा मानव आहे.

उद्‌भीज म्हणजे जमिनीचे भेदन करुन वर येणारी वृक्ष योनी आहे. वृक्षाला चेतना असते हे तर आपल्या शास्त्रकारांनी फार पूर्वीच सांगून ठेवले आहे. उद्‌भीज योनीत जन्माला येणे हे पापाचे शेवटचे फल आहे म्हणतात. स्थावर जन्म अत्यंत पराधीन आहे.

कोणी तोडल काय. पाणी घातलं काय. नाही काय; कांही करता येत नाही.

पशुजन्मामध्येही नामस्मरण घडले नाही आणि देवांच्या जन्माला जाऊनही नामस्मरण घडले नाही हा मोठा अपराध आहे. ज्ञान साधनं असताना त्या प्रमाणें न वागणं हा विशेष अपराध आहे म्हणून त्या बद्दलही क्षमा मागितली आहे. अमूकच जन्म प्राप्त झाला म्हणजे नामस्मरण घडतं. ईश्वराची उपासना घडते असं नाहीये.

गीतेमध्ये भगवान् सांगतात अभ्यास चालू असताना मध्येच मृत्यु आला तर तो फुकट जात नाही. संस्कार झालेली बुद्धी आपल्या बरोबर पुढच्या जन्मात येते आणि पवित्र आचरण करणारे, उत्तम बुद्धी संपन्न महात्म्यांच्या कुळामध्ये जन्म येतो.

जरायुज योनी म्हणजे गर्भातून उत्पन्न होणारी मानव योनी. ज्ञान नाही. तसे संस्कार नाहीत म्हणून गर्भाशयात नामस्मरण घडले नाही पण गर्भात असतानासुद्धा आणखी ज्ञान व्हायला हरकत नाही. प्रल्हादजींचे उदाहरण प्रसिद्ध आहे.

हिरण्यकश्यिपू गेलेला असता इंद्राने त्याच्या राज्यावर हल्ला केला. सगळे दैत्य घाबरून पळून गेले. कयाधुला, हिरण्यकश्यिपूच्या पत्नीला, पकडून इंद्र घेऊन चालला असता नारद महर्षी वाटेत भेटले. ते म्हणाले, ''इंद्रा या स्त्रीने तुझे काय केले? तुझा शत्रु हिरण्यकश्यिपू आहे, कयाधु नाही.'' इंद्राने उत्तर दिले, ''ही गर्भिणी आहे. हिला मुलगा झाल्यावर मी त्याचा नाश करणार आणि मग हिला सोडून देणार.''

द्वेषाचे हे उदाहरण आहे. हिच्या उदरामध्ये लहान मूल असले तरी इंद्राच्या मनांत दया उत्पन्न झाली नाही. तो त्या मुलाकडे शत्रुचा मुलगा म्हणून पहातोय. नारदाने त्याला सांगितले, ''हा

गर्भातला जीव मोठा भगवत् भक्त आहे. भगवान् श्रीहरी ह्याचे रक्षण करणार आहेत. तूं इंद्र जरी असलास तरी ह्या मुलाला तूं मारु शकणार नाहीस. ह्या स्त्रीला तूं सोडून दे'' इंद्र जरी झाला तरी त्यालाही भीती आहेच. आपले इंद्रपद टिकेल की नाही. आपल्याला दु:ख आलं तर वगैरे चिंता त्यालाही आहेच. नारदांसारखे महर्षी संतप्त झाले आणि आपण जर त्यांची अवज्ञा केली तर आपले राज्य राहाणार नाही याची त्यालाही जाणीव आहे. शेवटी इंद्राने कयाधुला सोडून दिले. मग नारद तिला आपल्या आश्रमात घेऊन आले. दैत्याची स्त्री म्हणून तिचा द्वेष केला नाही. तिला सांगितले, ''इथे तूं निश्चिंत मनाने राहा. तुला इथे कोणाचीही भीती नाही. तुझा पती तपश्चर्या पूर्ण करुन परत आल्यावर तूं जा.'' कयाधु निर्भयपणाने तिथे राहिली. कयाधुच्या गर्भातील जीवावर कृपा करायची नारदांना ईश्वरी प्रेरणा झाली.

गर्भावस्थेत असलेल्या प्रल्हादजींना नारदांनी भक्तीमार्गाचा उपदेश केला. भक्तीमार्गाचे रहस्य, आत्मानात्म विवेक, आनंदघन परमात्म स्वरूप कसे आहे वगैरे सगळं समजावून सांगितले. नारदांच्या कृपेने प्रल्हादजींना ईश्वरस्वरुपाचे ज्ञान झाले आणि दिव्य भक्तीची प्राप्ती झाली. सर्वत्र श्रीहरि आहे ही परा भक्ती नारदांच्या कृपेने प्रल्हादजींच्या मनांत उत्पन्न झाली. परा भक्ती उत्पन्न झाल्यावर दैवी संपत्ती सहज मिळते.

***अभयं सत्वसंशुद्धिर्ज्ञानयोगव्यवस्थिति:***
***दानं दमश्च यज्ञश्च स्वाध्यायस्तप आर्जवम् ॥१६.१॥***

निर्भयता हे दैवी संपत्तीचे पहिले लक्षण आहे. भगवत् भक्त हा निर्भय असतो. हे प्रल्हादजींचे उदाहरण आहे. चौथ्या पांचव्या वर्षी भगवंताचे दिव्य ज्ञान आहे. पूर्ण परा भक्ती आहे, श्रद्धा आहे.

विश्वास आहे. त्यामुळे कशाचीच त्यांना भीती नाही. आत्मा अमर आहे आणि त्याला मृत्यु नाही हे ज्ञान पक्क आहे. त्यामुळे तो हिरण्यकश्यिपू रागावला आणि त्याने जरी मारले तरी कोणाला? माझा म्हणजे आत्म्याचा नाश होऊच शकत नाही.

देहाभिमान पूर्ण गेला. देहापेक्षा आपण वेगळे आहोत. आत्मरुपाने आपण अमर आहोत. अविनाशी आहोत हे ज्ञान जर पक्के झाले तर मृत्युचीही भीती नाही. किंवा जरी देह तादात्म्य राहिले पण ईश्वराची उत्कट भक्ती असेल आणि ईश्वर आपले संरक्षण करणारा आहे ही भावना जर दृढ असली तरी ईश्वर आपले संरक्षण करतो.

***सकळ जीवांचा करीतो सांभाळ।***

नाथमहाराज सांगताहेत. हे प्रत्यक्ष अनुभवाने सांगताहेत. सर्व ठिकाणी परमात्मा आहे ही खरी दृढ भक्ती त्यांना निर्माण झाली आहे. अर्थात् सर्वांचे संरक्षण तोच करणारा आहे ही एक दृढ बुद्धी उत्पन्न झाल्याकारणाने जरी देह तादात्म्य राहिलेले असले तरीसुद्धा भगवंतावरती पूर्ण विश्वास असल्या कारणाने ईश्वर संरक्षण करण्याला समर्थ आहे. आपल्याला चिंता करण्याचे कारण नाही या भावनेने तो भक्त निर्भय असतो.

एवढ्या मोठ्या त्रैल्योक्यात राज्य ज्याच्या स्वाधीन आहे तो प्रल्हादाला विचारतो, ''माझ्या आज्ञेचे उल्लंघन तूं कोणाच्या बळावर करतो आहेस? कोण तुझे संरक्षण करणारा आहे? मी रागावलो तर त्रैलोक्यातले कोणी जिवंत राहाणार नाही.'' वगैरे वल्गना त्याने केल्या. प्रल्हादजी म्हणाले,''पिताजी, तुम्ही काय जिंकलाय? स्वत:चे मन तुमच्या स्वाधीन नाहीय रागावता काय. वाटेल तसे बोलता काय, वाटेल त्याचा नाश करण्याचा प्रयत्न

करता काय. द्वेष काय करता. तुमचा मनावर ताबा नाही. तुम्ही जग जिंकले असेल पण अशी बडबड करणं बरं नाही.'' ही निभर्यतारुपी दैवी संपत्ती सहज मिळाली आहे. नारदांची कृपा गर्भावस्थेतच झालेली आहे.

ध्रुव आणि प्रल्हाद हे दोघेही नारदांचे शिष्य. नारदांनीच दोघांचे कल्याण केले. नारदांच्या कृपेने दोघांच्यावरही ईश्वर प्रसाद झाला. परंतु प्रल्हादजींचा एक अधिकार मोठा आहे. गर्भावस्थेत त्यांना नारदांनी केलेला उपदेश फलद्रुप झाला.

अगोदर गर्भावस्थेत ज्ञान होण्याची व्यवस्था काय आहे; हे सगळं काल्पनिक आहे अशी आपण समजूत करून घेणार. इतिहास एक स्वतंत्र प्रमाण आहे. पुराण, इतिहास, धर्मशास्त्र त्याला म्हणतात. व्यास महर्षींनी हे प्रमाण सांगून ठेवले आहे. घडलेल्या कथा त्यांनी सांगितल्या. त्याला आपण अप्रमाण समजतो. आपलही नुकसान आहे आणि इतरांचेही नुकसान आहे. तर या प्रमाणे गर्भावस्थेतही ज्ञान होणे शक्य आहे असे एक (प्रल्हादजींचे) उदाहरण जरी असले तरी पुरे आहे. गर्भामध्ये कांहीही ज्ञान होऊ शकत नाही हा सिद्धांत होऊ शकत नाही. पण ज्ञान देणारे तसे अधिकारी असले पाहिजेत.

नारदांसारख्याची कृपा झाली. त्यांचा संकल्प झाला आणि त्या संकल्पाप्रमाणे पूर्व कर्मामुळे गर्भावस्थेचे कष्ट त्यांना झाले नाहीत. उलट उत्तम ज्ञान आणि भक्ती त्यांना मिळालेली आहे. पण ही सर्व सामान्य स्थिती नाही. आमचे पूर्व कर्म तसे नसल्याने ती आम्हाला प्राप्त होत नाही हेच आम्हाला मान्य व्हायला पाहिजे ना ! पश्चाताप होण्याचे कारण म्हणजे प्रल्हादजीं सारखे ज्ञान आम्हाला कां होऊ नये? कारण आमचे पूर्वीचे कर्म, सुकृत तसे नाहीये.

आमचे सुकृत नसल्यामुळे आम्हाला गर्भावस्थेत ज्ञान होऊ शकत नाही, पुढेही तळमळ, तन्मय अवस्था प्राप्त होऊ शकत नाही.

ध्रुवाचे उदाहरण हे या तळमळीचे आहे. आईच्या आज्ञेने पांचव्या वर्षी तपश्चर्या करण्यासाठी तो बाहेर पडला. नारदांची भेट झाली. नारदांनी मंत्रोपदेश करून सगळं ज्ञान दिलं. ईश्वरदर्शन करून घेतल्याशिवाय परत यायचे नाही मग देह पडला तरी हरकत नाही असा त्याचा दृढ निश्चय झाला होता. अत्यंत उत्कट तळमळ त्याला लागली होती. आमच्याकडे तशी तळमळ आहे का? पूर्व सुकृत जर असेल तर कोणीही महात्मा उपदेश करु शकतो.

मदालसेने आपल्या तीनही मुलांना जन्मल्यावर ज्ञानाचा उपदेश केला आणि जीवन्मुक्त अवस्था प्राप्त करून दिली. पाळण्यात तिने त्यांना उपदेश केला. देहापेक्षा आत्मा वेगळा आहे. तोच तुमचं खरं आनंद स्वरूप आहे. तुम्हाला दु:ख होऊ शकत नाही.

सद्गुरुंच्या कृपेने आणि संकल्पाने अशा प्रकारचे ज्ञान होऊ शकते. पण आमचे तसे सुकृत नाहीये म्हणून महाराज आमच्यावर कृपा करा.

***मया जातमात्रेण संमोहितेन् गृहीतं कदाचिन्न ते नाम दत्त।***
***क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं प्रभो क्लिन्नचित्त॥***

भगवत् भक्ताच्या मनाची अवस्था कशी होते ईश्वर कृपेने हे या स्तोत्रामध्ये महाराजांनी सांगितलेले आहे. पश्चाताप झालेला आहे. मुक्तावस्था प्राप्त करण्याची योग्यता कशी प्राप्त होते हे वर्णन करीत असताना महाराजांनी गर्भवासाचे उदाहरण दिले. गर्भवासात अतिशय कष्ट होते म्हणून नाम घेता आले नाही ही चूक झाली. पण

मग जन्माला आल्यानंतर तरी नामस्मरण घडले का? नाही घडलं. त्याचं कारण 'संमोहितेन'. अत्यंत मोह उत्पन्न झाला. आत्मानात्म विवेक नाहीसा झाला. हा अविवेक, मोह आपल्याला अनेक प्रतिबंध निर्माण करतो.

*इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम्।*
*विवस्वान्मनवे प्राह मनुरिक्ष्वाकवेऽब्रवीत॥ ४.१॥*

गीतोपदेश चालू असताना भगवान् अर्जुनाला म्हणाले, तुला मी जो योग सांगतोय तोच मी पूर्वी सूर्याला सांगितला. हा मार्ग नष्ट होण्याची पाळी आली म्हणून पुन्हा मी तुला सांगतोय.

अर्जुनाला मोह उत्पन्न झाला. विवेक नाहीसा झाला. इतकेच नव्हे तर भगवान् श्रीहरींच्या शक्तीबद्दलही मोह उत्पन्न झाला. तो म्हणतो.

*अपरं भवतो जन्म परं जन्म विवस्वत:।*
*कथमेतद्विजानीयां त्वमादौ प्रोक्तवानिति॥४.४॥*

तुमचा जन्म तर अगदी अलीकडचा आहे आणि सूर्यनारायण किती पूर्वी (अनादि काला) पासून आहे. तुम्ही त्याला उपदेश कधी केला?

परमेश्वराला काल मर्यादा आहे हा मोह आहे. तुमचा जन्म अलीकडचा आहे, पूर्वी तुम्ही नव्हता म्हणजे तुमची शक्तीसुद्धा मर्यादित आहे असे समजून अर्जुन बोलतो आहे. भगवत् गीतेचा उपदेश ऐकण्याची ज्याची योग्यता आहे असा अर्जुन हा प्रश्न करतोय. समोर दिसणारं भगवंताचं स्वरूप पाहून तो हा प्रश्न विचारतो आहे. भगवंतांना याचा खुलासा करावा लागला. ते म्हणाले. ''बाबा,

असे किती तरी जन्म तुझे आणि माझे होऊन गेलेले आहेत. ते फक्त मला ठाऊक आहेत. तूं किती वेळा जन्माला आलास आणि मी किती वेळा जन्मलो हे तुला माहीत नाही. त्यामुळे मी सूर्यनारायणाला कधी उपदेश केला याची तुला कल्पना नाही.'' अर्जुनाचा मोह दूर करण्याकरता भगवंतांना हा स्पष्ट खुलासा करावा लागला.

जन्माला आल्यापासून मोहरहित असणे फार महत्त्वाचे आहे. तशी सत्संगती घडली पाहिजे. आपले पूर्व दुष्कृत आड येऊन उपयोगी नाही. त्रिविक्रम भारतींसारखा तीन वेदांचा अभ्यास ज्यांनी केला त्यांनाही हा मोह उत्पन्न झाला. दत्तप्रभू, राजाच्या भक्तीभावाप्रमाणे वनांत जात होते. त्याच्या इच्छेप्रमाणे इतरही कुठे जात होते हे संन्यास धर्माला धरून नाही असा त्यांना एक भ्रम झाला. नुसता मनामध्ये संदेह उत्पन्न झाला असं नाही तर चार लोकांच्या जवळ ''हे संन्यासी योग्य नाही'' असे म्हणून लोकांचा बुद्धीभेद करण्याचा प्रयत्नही त्यांनी चालू केला. दत्तप्रभूंचे आचरण आचारधर्माला धरुन नाही म्हणजे ईश्वराला कर्मबंधनही आहे हा मोह आहे. श्रीकृष्णरुपी परमात्म्याला काल मर्यादा आहे असे अर्जुन समजला आणि दत्तप्रभूंना कर्मबंधन आहे असे त्रिविक्रम भारती समजताहेत. दत्तप्रभूंनी संन्यास धर्मांप्रमाणे वागले पाहिजे हा भ्रम त्यांना निर्माण झाला. हाही मोह आहे. पण तो मोह भगवंतांनी दूर केला. त्रिविक्रम भारतींसारखे ज्ञानी समजणारे जे आहे त्यांनी थोडा विचार केला पाहिजे. संशय. कोणाला उत्पन्न होत नाही? पण संशय उत्पन्न झाला तरी त्याचं कारण काय आहे. आपण

समजतो ते कारण योग्य आहे का, हा विचार करण्याची स्वत:कडे योग्यता पाहिजे. जर असा विचार झाला नाही तर तो मोह दृढ होतो आणि अविचार अधिकाधिक वाढत जातो. दत्तप्रभू आपण होऊन त्रिविक्रम भारतींकडे गेले. त्यांना विश्वरूप दाखवले आणि त्यांचा मोह दूर केला.

ब्रह्मदेवांनाही मोह उत्पन्न झाला अघासुरालाही मारणारा हा नंदाचा पुत्र आहे तरी कोण, कोणी मोठा योगी पुरुष आहे की काय? याची परीक्षा आपण घेतली पाहिजे असा विचार ब्रह्मदेवानी केला. गोकुळातली मुले आणि वासरे नेली. गोपालकृष्णांनी अघासुराला मारून सर्वही वासरे आणि मुले परत आणली. दैत्यानांच मोह होतो असं नाही चांगल्या कुळामध्ये उत्पन्न झालेले जे सात्विक प्रवृत्तीचे जीव आहत त्यांच्या बुद्धीतही मोह उत्पन्न होतो. ब्रह्मदेवांसारख्यांनाही मोह उत्पन्न झाला. ईश्वराची शक्ती ते जाणू शकले नाहीत. नंतर त्यांना पश्चाताप झाला.

***सर्वं विष्णुमयं जगत्***

हे आपण नुसतं ऐकतो. पण त्या प्रमाणें आपली बुद्धी निर्मोह झालेली नाही. ईश्वराला काल मर्यादा नाही आणि अमूक एक स्वरूपाचा ईश्वर आहे म्हणून आकार मर्यादाही नाही. वस्तु परिच्छेदही नाही. हे तीनही मोह दूर झाले पाहिजेत. तर ईश्वर स्वरुपाचा साक्षात्कार झाला असं समजता येईल. जरी भक्ती, उपासना घडली तरी सुद्धा हा मोह आड येतो. पूर्व प्रारब्ध आहे. त्यामुळे तशी बुद्धी निर्माण होते.

*निर्मानमोहा जितसंगदोषा अध्यात्मनित्या विनिवृत्तकामा: ॥१५.५॥*

निर्मोह राहाण्याची मूळ शक्ती ईश्वराची फार मोठी आहे. महात्म्यांचे वर्णन करताना भगवान् सांगतात. ते मोहरहित झालेले आहेत. त्यांचे निरंतर चिंतन, अभ्यास चाललेला आहे. सगुण, निर्गुण परमात्म्याचे अखंड अनुसंधान त्यांच्या बुद्धीमध्ये आहे. त्यामुळे ते निवृत्त कामः आहेत. ज्यांना कोणच्याही प्रकारचा मोह राहिलेला नाही. ईश्वराच्या शक्तीची पूर्ण जाणीव आहे असे महात्मे, भगवान म्हणतात. माझ्याजवळ येतात. ईश्वरापेक्षा मी वेगळा नाही हे ज्ञान अनेक जन्मांच्या अभ्यासाने होते. मोहरहित स्थिती प्राप्त होते. अर्जुनाला निमित्त करून भगवान ही जाणीव करून देताहेत. तरीही मोह जात नाही. आपण जीवन्मुक्त सच्चिदानंदघन आहोत अशी अवस्था प्राप्त करून घेणे किती कठीण आहे !

ब्रह्मदेवांना पश्चाताप झाला. त्रिविक्रम भारतींना सर्व सैन्यच संन्यासी दिसू लागले. त्यांच्या मनांत दत्तप्रभू संन्यासधर्मांचे पालन करीत नाहीत असा आक्षेप होता आणि त्यांनी तो सर्व लोकांच्यात बोलून दाखवला. परंतु त्रिविक्रम भारती वर जाऊन खाली पडणार (ज्ञान भूमिकेवरून) म्हणून दत्तप्रभूंनी त्यांना सांवरून घेतले. त्यांचे अज्ञान, मोह दूर केला. संपूर्ण गीता ऐकल्यावर अर्जुन म्हणाला, ''माझा मोह आज दूर झाला. तुमच्या उपदेशाप्रमाणे मी वागणार आहे.'' भगवान् त्याला म्हणतात –

***सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज।***
***अहंत्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ॥१८.६६॥***

हे भगवंताचे केवढे मोठे आश्वासन आहे. धर्माधर्मांचा विचार तू स्वतःच्या बुद्धीने, अहंकाराने मोहामध्ये सांपडू नको. मी धर्माने

वागतो आणि दुसरे वागत नाहीत. हा विचार चांगला नाही. दत्तप्रभू विश्वरूपी आहेत त्यांच्या गुणदोषांचा विचार करायचा नाही.

परीक्षित राजानेसुद्धा रासक्रीडेचे वर्णन ऐकून शुकाचार्यांना विचारले,''धर्मांचे संरक्षण करण्यासाठी अवतार धारण करून भगवान् आलेले आहेत मग हे (रासक्रीडा) धर्मांच्या विरुद्ध नाही कां झाले?'' जी शंका त्रिविक्रम भारतींना आली तीच शंका परीक्षित राजाला आली. परीक्षित राजाने विचारले,''परस्त्री बरोबर रासक्रीडा करणे हा दोष नाही का?'' शुकाचार्य महाराजांनी त्याला बजावलेले आहे,''तेजस्वी, तपस्वी, साक्षात्कार संपन्न महात्म्यांच्या हातून घडणारी गोष्ट चांगली आहे की वाईट याचा विचार करण्याचा अधिकार आम्हाला नाहीये. अग्नीत कांहीही आहुती देतात. तूपही टाकतात. पाणीही एखाद्या वेळेला पडतं. ओलं लाकूड पडतं. वाळलेले लाकूड पडतं. परंतु अग्नीचे स्वाभाविक तेज असं आहे की तो सर्वच एकंदर दग्ध करुन टाकतो. तसे आपण महात्म्यांचा गुणदोषांचा विचार करू नये. त्यांच्या शिकवणुकीप्रमाणें आपले आचरण मात्र ठेवावे. त्यांच्या गुणदोषांकडे पहायला गेलं तर आपले गुणदोष आपल्याला दिसत नाहीत. उलट आपणच चांगले आहोत असा एक अभिमान वाढत जातो.

तेव्हां सर्वही संन्यासी आहेत. परस्त्रियांबरोबर आपण रासक्रीडा करतो ही भावनाच त्या ठिकाणी नाहीये. श्रीकृष्णांच्या वयाच्या सातव्या वर्षी ते रासक्रीडा खेळले असे म्हणतात. त्यावेळी धर्माधर्मांचा विचार तरी कसा मनांत येईल? वयाचा विचार केला तरी तशी भावना होणे शक्य नाही. बरं. त्या सर्व स्त्रिया त्याच वेळी

आपल्या घरातच आहेत असे त्या गोपालांना दिसत होते. तसे नसते तर या गोपी कुठे गेल्या याची त्यांनी चौकशी केली नसती का? अशा अनेक गोष्टी आहेत.

तेव्हां तो मोह दूर करण्याकरताच सर्वही संन्यासीरूपाने महाराजांनी त्रिविक्रम भारतींना दर्शन दिले. सगळे संन्यासी आणि आम्ही सगळे एक आहोत. या भूमिकेवर गेल्याशिवाय तुझा मोह जाणार नाही. इथे तुझे शब्दज्ञान उपयोगी पडलं नाही. आपण संन्यासी आहोत आपण कसे वागतो. इतर संन्यासी कसे वागतात हा अभिमान निर्माण झाल्यामुळे त्रिविक्रम भारती महाराजांची निंदा करू लागले. म्हणून त्यांचा मोह दूर करण्याकरता महाराजांनी त्यांना सर्व संन्यासी रूपात दर्शन दिले. सर्वच बह्म आहे. ब्रह्माशिवाय दुसरं कांहीही नाही. एक परमात्मा सर्वरूप झाला आहे हे पटणं आणि त्या प्रमाणे आचरण घडणे फार कठीण आहे.

तर त्रिविक्रम भारतींसारख्यांचा मोह दूर केला. भगवंतांनी स्वत:च दूर केला. संन्यासी सगळे आम्ही एकच आहोत. एकत्व बुद्धी उत्पन्न झाल्यानंतर शोक आणि मोह दूर होतो म्हणतात. अनेकत्त्व बुद्धी जो पर्यंत आहे तो पर्यंत शोक, मोह वगैरे विकार आहेत.

संपूर्ण द्वारका नगरी निर्माण केली. जगामध्ये जे सुख नाही ते सर्व प्रकारचे सुख, विश्वकर्म्याला आज्ञा करून, त्या ठिकाणी उत्पन्न केले. सव्वाशे वर्ष यादव कुळात भगवान सुखामध्ये राहिले. कोणीही त्यांच्याकडे वांकड्या दृष्टीने पाहू शकत नव्हते. अगदी इंद्रादिक देवसुद्धा. परंतु एक पेच प्रसंग निर्माण झाला शेवटी. यादवांना

विप्रशाप झाला आणि भगवंतांनी त्याला अनुमती देऊन टाकली. बरं झालं. सर्वही यादवांच्यात परस्पर यादवी निर्माण झाली आणि त्यांचा नाश झाला. आपसात लढून ते नष्ट झाले हे अज्ञान आहे. ज्ञान म्हणजे वस्तुत: द्वैत नाहीच आहे. कोणालाही उपदेश करण्याचे कारण नाही कांही नाही ही भावना अंत:करणात उत्पन्न झालेले महात्मे आहेत. त्यांना केव्हांही मोह उत्पन्न होत नाही. अशी मोहरहित अवस्था निरंतर राहिली म्हणजे मग प्रमाद होत नाहीत. अपराध घडत नाहीत. आपल्या हातून. अपराधांची क्षमा करणारे भगवान् आहेत म्हणून बरयं. सर्व सामान्य जीवांप्रमाणे त्यांची अवस्था नाही हे लक्षात ठेवले पाहिजे. म्हणून क्षमा याचना केल्यानंतर आपले अपराध दूर होतील अशी बुद्धी होत नाही तर काय हे स्तोत्र होणारच नाही ना ! आपण चूक करायची आणि चूक झाली म्हणायचं. कोण ऐकून घेतो? पण भगवान् ऐकून घेतात.

त्यांच्याकडे पूर्ण वात्सल्य आहे. आपणच सृष्टी निर्माण केलेली आहे. आपणच सर्व विश्वरूप झालेलो आहोत. ज्ञान भूमिकेवर ते नेहमी असल्यामुळे त्यांना मोह राहिला नाही. एकत्व दृष्टी आहे. अनेकत्व दृष्टी नाही. म्हणून शोक मोह नाही. सगळ्या यादवांचा नाश झाला तरी भगवान् शांत चित्ताने बसून राहिले आणि मूळ निजधामाला निघून गेले. संपलं. कार्य संपलेलं आहे. साधूंचे संरक्षण झालं म्हणजे जगाचेही संरक्षण हे सगळं कार्य करून शोक, मोहरहित अशा प्रकारची जीवन्मुक्त अवस्था ज्ञानी महात्म्यांची असते हे शेवटी सर्व लोकांना दाखवून भगवान् निघून गेले. रामावतारामध्ये अयोध्येतील सर्व लोकांना बरोबर घेऊन रामचंद्र निजधामाला गेले.

असं म्हणतात. कृष्णजन्मामध्ये सर्वांचा नाश झालेला डोळ्यांनी पाहून निजधामाला निघून गेले. त्यांची ही अशी शोक, मोहरहित अवस्था आहे. तर ही अवस्था आमची नाही म्हणून प्रार्थना आहे –

***मया जातमात्रेण संमोहितेन् गृहीतं कदाचिन्न ते नाम दत्त।***
***क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं प्रभो क्लिन्नचित्त॥***

अत्यंत मोहामध्ये मी पडलोय आणि आपलं परम पवित्र जे नाम आहे ते सर्व मोह दूर करणारे नाम ज्याची शक्ती आहे ते माझ्याकडून घेतले गेले नाही या अपराधाची आपण मला क्षमा करा.

भगवान दयाळु आहेत ही भावना मनामध्ये पाहिजे. आमच्या मोहामुळे आमच्या हातून हा दोष झालेला आहे याचीही जाणीव आहे. हा अपराध करीत राहायचे आणि प्रार्थना करीत राहायचे. देवाची प्रार्थना केली की देव क्षमा करतात ही कल्पना करून घ्यायची अपराध करीत बसायचं. आता काय करायचं. ही तळमळ मनामध्ये उत्पन्न झाल्या कारणाने भगवंताची क्षमा मागायची बुद्धी झाली आहे.

प्रत्यक्ष जन्माला आल्यावर मी भ्रष्ट झालो. पुढे बाल्यावस्था, तारूण्यावस्था, वार्धक्यावस्था प्राप्त झाली तरीही कांही माझ्यात सुधारणा झाली का? नाही. जन्माला आल्याबरोबर मोह उत्पन्न झाला. म्हणून अपराध घडला. नामस्मरण बाल्यावस्था, तारुण्यावस्था किंवा वृद्धावस्था यापैकी कोणत्याच अवस्थेत झाले नाही. ईश्वरापासून मी दूर होत गेलो.

ईश्वराच्या जवळ जाण्याची साधनं संतांनी सांगून ठेवली

आहेत. माझ्या हातून त्या पैकी कोणतेच साधन घडले नाही.

***गृहितं कदाचिन्न ते नाम दत्त***

हाच एक अपराध या ठिकाणी दाखवलेला आहे. पूर्णावलोकन केलं. पूर्व जन्मात आपण कोणत्या स्थितीत आसक्त होतो त्यामुळे आपल्याला कशी कशी दु:ख भोगावी लागली याचेही अवलोकन केले. आणि मुख्य म्हणजे नामस्मरणापासून आपण विन्मुख झालो ह्या जाणिवेतून अत्यंत कळकळीने ही प्रार्थना त्या भगवत् भक्ताने केली आहे. तो भगवत् भक्त बालपणाचे चिंतन करतो आहे.

आमच्या हातून झालेल्या अपराधांची जाणिवच आम्हाला राहात नाही. जाणिवच झाली नाही तर त्याच्याबद्दल पश्चाताप होण्याचा प्रसंग येणार कधी? आणि तो पश्चाताप तरी खरा कशावरून?

बालपण सर्व मित्रमंडळी बरोबर बालक्रीडा करण्यात गेले. आपले आयुष्य कसे संपतय याचा विचारच आपल्या मनामध्ये येत नाही उलट जास्ती जास्ती अवनतीच होते आहे. अवनती झाली की उन्नती झाली याचंही भान राहात नाही आणि अशा प्रकारची स्थिती उत्पन्न होते. त्यांचही वर्णन या श्लोकामध्ये आलेले आहे.

गर्भवासातून मुक्त होऊन जन्माला आला जीवात्मा आणि त्याला मोह उत्पन्न झाला. जीवात्मा बाहेर आल्याबरोबर परमेश्वराची मायाशक्ती मोहात टाकते त्यामुळे त्याचे ईश्वराकडे लक्ष जाऊ शकत नाही. भगवंताची जर पूर्ण कृपा असेल आणि जीवात्मा त्याला जर शरण गेला तर तो या माया मोहातून तरून जातो. ते उपासनेचे

सामर्थ्य आहे. उपासनेचा एक अंश म्हणजे नाम स्मरण. भगवंताचे अखंड नामस्मरण जर घडले तर सर्वही पातकांचा नाश होतो. बुद्धी स्थिर होते.

सर्वसाधारण जीवाची बुद्धी चंचल झालेली असते. हे पाहिजे. हे अनुकूल आहे. ते प्रतिकूल आहे असे अनेक प्रकारचे विकार मनामध्ये उत्पन्न होतात. आणि त्या विकारांमुळे ईश्वराची उपासना घडू शकत नाही.

सद्गुरू नारायणस्वामी महाराजांच्या सारख्यांना हा मोह उत्पन्न झाला. याची दोन उदाहरणे आहेत. मोह पूर्ण गेल्याचेही उदाहरण त्यांच्या चरित्रामध्ये आहे. शास्त्राप्रमाणे सर्व संस्कार झालेले आहेत. उपनयन, वेदाध्ययन झालेले आहेत. आचरणही शास्त्राप्रमाणे आहे. पण अशा वेळेला मोह होण्याचा प्रसंग आलेला आहे. घरी असताना अध्यापनाचे कार्य करीत होते. अनेक विद्वत सभेत भाग घेत. वादविवाद करणे अत्यंत कठीण आहे. कोणच्या वेळेला बुद्धीला प्रतिबंध होईल कांही सांगता येत नाही. प्रतिस्पर्ध्याची बुद्धी कशी आहे आपल्याला अंदाज येत नाही. अशाच एका सभेत नारायण स्वामी महाराजांचा योग्य उत्तर देता न आल्याने पराजय झाला आणि त्यांच्या मनावर त्याचा परिणाम झाला. कुटुंब मागे ठेवून ते अधिक ज्ञान मिळवण्यासाठी काशीला गेले. बृहस्पती जरी वादविवादाला आले तरी त्यांनाही निरुत्तर करण्याची शक्ती आपल्याला मिळावी या करता त्यांनी अभ्यास करायचे ठरवले. ईश्वराच्या उपासनेने सुद्धा अशा प्रकारची शक्ती प्राप्त होते.

दैवयोग चांगला एक मोठे ब्रह्मज्ञानी संन्यासी महात्मे त्यांना सद्गुरू म्हणून मिळाले. येण्याचे कारण त्यांनी सद्गुरूंना सांगितले

आणि त्यांच्याजवळ अभ्यास करण्याकरता राहिले. विद्या मिळवणे हा दोष नाही पण त्या विद्येचा आपण उपयोग कसा करतो हे महत्त्वाचे आहे. वादविवादाकरता विद्या मिळवणे हा दोष आहे. दहा बारा वर्ष अध्ययन झाल्यावर एक दिवस गुरुशिष्य गंगेवर स्नानाला गेले असता गुरुमहाराजांनी आपल्या शिष्याला विचारले,''बाबा, तुमचा विद्याभ्यास तुमच्या इच्छेप्रमाणे झाला ! आम्हाला गुरूदक्षिणा देऊन आपल्या घरी जा. घरची मंडळी वाट पहात असतील.'' नारायण स्वामी महाराज म्हणाले,''मी अंकिचन आहे, महाराज.'' आपण माझ्या शक्तीप्रमाणे मागा.'' गुरू महाराज म्हणाले,''हातात गंगोदक घेऊन गुरूदक्षिणा देतो असे सांगा.'' आपण माझ्या शक्तीप्रमाणे मागा.'' नारायण स्वामी महाराजांनी त्या प्रमाणे केल्यावर गुरुमहाराज म्हणाले,''आजपासून कोणा बरोबरही वादविवाद करणार नाही असं तुम्ही कबूल करा. हीच आमची गुरूदक्षिणा.'' वादत्याग. वाणीच बंद केली ना !

ईश्वराच्या नामस्मरणाकडे वाणी वळली पाहिजे. वादविवाद हा त्याला प्रतिबंध होता. तो प्रतिबंध सद्गुरूंनी दूर केला म्हणजे त्या मोहातून त्यांना बाजूला काढलंय स्वामींच्या मनाला वाईट वाटलं. दोन चार दिवस स्वस्थ राहिले. त्यांना वाटल, आपण ज्याच्याकरता घरदार सोडून इतक्या लांब आलो ते न मिळवता तसेच परत गेलो म्हणजे लोक निंदा करणार. म्हणणार गेलात कशाला काशीला.

पण गुरूमहाराजांनी त्यांची समजूत काढली. ते म्हणाले,''हा जन्म तुम्हाला पुन्हा मिळणार नाही. विचार करा. तुम्ही ज्ञानी आहात. तुमचे प्रारब्ध किती उत्तम आहे ! साक्षात् भगवान् नृसिंहसरस्वति


दत्तात्रेय महाराजांकडून तुम्हाला संन्यास दीक्षा मिळणार आहे. त्यांची सेवा करा आणि कृतार्थ व्हा.'' स्वामी महाराजांची समजूत पटली. नंतर त्यांनी परत गांवी येऊन सर्व संग परित्याग केला. वैराग्य उत्पन्न झाले. मुलींची लग्ने झाली. आणि नंतर ते वाडीत येऊन राहिले. अशा रीतीने मोहातून सद्‌गुरूंनी त्यांना बाजूला काढले. पण त्यांना त्यांचे उत्तर आयुष्य कसं चांगलं जाणार आहे ते सांगावे लागले. भगवान दत्तात्रेय तुमच्यावर कृपा करणार आहेत. त्या स्थानात तुम्ही जा हे समजावून सांगितल्यावर त्यांना पटले. वादविवादाची इच्छा पूर्ण झाली आणि नंतर त्या ठिकाणी सद्‌गुरू महाराजांची कृपा झाली.

उपासनामार्गामध्ये भगवंताचे अखंड नामस्मरण करणे याला विशेष महत्त्व आहे हे दाखिवण्याकरता या सहा सात श्लोकामध्ये पश्चाताप व्यक्त केलेला आहे.


***मया जातमात्रेण संमोहितेन् गृहीतं कदाचिन्न ते नाम दत्त।***
***क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं प्रभो क्लिन्नचित्त॥***


या श्लोकात, जन्माला आल्याबरोबर मोह उत्पन्न झाला आणि तो पुढे कायम राहून जन्म फुकट गेला म्हणून क्षमा मागितली आहे.

सद्‌गुरू नारायणस्वामी महाराज यांनाही सर्व जीवांप्रमाणे आरंभाला मोह झाला असेल. अधिक विद्याभ्यास करून वादविवाद करून विद्वतसभा जिंकण्याच्या इच्छेने ते काशीला जाऊन राहिले. त्यांच्या सुकृताने त्यांना 'शाब्देपरेचनिष्णांत' असे एक ब्रह्मनिष्ठ सद्‌गुरू मिळाले आणि त्यांनी नारायण स्वामींचे अध्ययन संपल्यावर नारायण स्वामींकडून गुरूदक्षिणा म्हणून ''वादविवाद करणार नाही'' असे वचन घेतले.









योगाभ्यास करणाऱ्याने सर्व प्रथम वाणीचा निराध केला पाहिजे. साधकाने अनावश्यक बोलणे कमी केले पाहिजे. मनाच्या वृत्ती कमी कमी होणे ही पुढची अवस्था आहे.

सद्गुरू महाराज नारायण स्वामींना म्हणाले.''वादविवादात दुसऱ्याचा पराजय करण्याचा भलताच मार्ग काय धरलात तुम्ही? वादविवादात अजिंक्य व्हायची वासना सोडून द्या तुम्ही. तुम्हाला प्रत्यक्ष भगवान दत्तात्रेय नृसिंहस्वरस्वती महाराज संन्यास दीक्षा देणार आहेत. तेच तुम्हाला मार्गदर्शन करून कृपा करणार आहेत.'' नारायणस्वामींना हे पटले विचारांती आणि एकदम ते भक्तीमार्गाकडे वळले. पुढे क्रमाक्रमाने त्यांची सुधारणा झाली. मोह दूर झाला. भगवान् नृसिंहसरस्वति स्वामी महाराजांचे दर्शन झाले. काशीक्षेत्रात गुरूमहाराजांनी सांगितल्यानंतर त्यांच्या अंत:करणात दत्तभक्ती उत्पन्न झाली. समाधीचा अभ्यास सुरू झाला. अखंड ध्यानाचा अभ्यास पूर्वाश्रमापासूनच चालू होता. पत्नी गेली. मुलींची लग्ने झाली. भगवान दत्तात्रेय आपल्याला कधी दीक्षा देताहेत याची वाट पहात ते या वाडी क्षेत्रात राहात होते.

पहाटे रोज संगमावर ते स्नानाला जात. एक दिवस असेच स्नानाला पाण्यात उतरले असता आपला कोणी तरी खाली पाय ओढत असल्याचे त्यांना जाणवले. वाईट वाटले. आता जर आपण बुडून मेलो तर गुरूमहाराजांनी दिलेल्या आशीर्वादाचे काय या विचाराने ते व्याकूळ झाले. आपला जन्म फुकट गेला. हे काय झाले असे त्यांना वाटले. पण काय विलक्षण घटना घडली. अचानक त्यांना त्या पाण्यात एक मोठे मंदिर दिसले. सद्गुरू नृसिंहसरस्वति

स्वामी महाराज सिंहासनावर बसले होते. ब्राह्मण मंडळी बसली होती.

नारायणस्वामी महाराज भगवान् नृसिंहसरस्वती स्वामी महाराजांना नमस्कार करुन उभे राहिले. महाराज म्हणाले,''तुम्हाला गुरूमहाराजांनी सांगितले होते ना त्या प्रमाणे आज संन्यास दीक्षा द्यायची आहे. लवकर आन्हिक वगैरे उरकून या.'' आणि त्या प्रमाणे यथाविधी संन्यासदीक्षा झाली. महाराजांनी नारायणस्वामींना आपल्या जवळ चार आठ दिवस ठेवून घेतले. आणि मग बाहेर पाठवले. नारायणस्वामीमहाराज इथे राहू लागले.

वाडीतल्या लोकांना संदेह निर्माण झाला. आत्ता आठ दिवसापूर्वी हे संन्यासी नव्हते आणि आता भगवी वस्त्रे कशी काय धारण करताहेत. म्हणून नारायण स्वामींना त्यांनी विचारले पण हे कांही उत्तर देईनात. मग लोकांनी त्यांच्यावर बहिष्कार टाकला. शेवटी स्वत: दत्तप्रभूंनी सर्व पुजाऱ्यांना सांगितले,''मी त्यांना संन्यास दिला आहे. त्यांचा छळ करु नका. मीच इथे राहायला सांगितले आहे.'' त्या प्रमाणे इथे राहून दत्तप्रभूंचे अखंड ध्यान ते करत होते. सगुणाचे आणि निर्गुणाचे दोन्ही ध्यान करत होते. त्यांना अशक्य कांहीच नाही. समाधी अवस्थेपर्यंत ते पोहोचले होते.

एकदा एक कुष्ठरोग झालेला ब्राह्मण गांवाबाहेर झोपडी बांधून राहात होता. आपला रोग जावा, देवाने कृपा करावी म्हणून तो इथे राहात होता. एक दिवस दत्तप्रभूंनी त्याला दृष्टांत देऊन सांगितले.''नारायणस्वामी नांवाने एक संन्यासी पहाटे स्नानाला जातात. ते स्नानाला नदीत उतरले की तूंही पाण्यात उतर. त्यांचे

पाणी तुझ्या अंगावरून गेले की तुझा रोग बरा हाईल.'' नारायण स्वामींना यातले कांहीच माहीत नव्हते. त्या दृष्टांताप्रमाणे तो रोगी ब्राह्मण रात्रीच संगमावर जाऊन बसला. पहाटे नारायण स्वामी भगवन्नामस्मरण करीत संगमावर स्नानाला आले. ते पाण्यात उतरल्यावर तो रोगी ब्राह्मणही पाण्यात उतरला. ह्यांच्या लक्षात आले हा कांही तरी देवांचा घोटाळा आहे. ते तसेच बाहेर आले आणि ह्याला विचारले,''कशाला आलास तूं?'' तो म्हणाला, ''अंघोळीला'' हे म्हणाला, ''मग कर अंघोळ'' तो म्हणाला, ''नाही तुम्ही अंघोळ केली की मी अंघोळ करणार.'' नारायण स्वामींनी विचारले, ''हे तुला कोणी सांगितले?'' त्याने त्याला दत्तप्रभूंनी दिलेला दृष्टांत सांगितला. ते ऐकल्यावर स्नान न करता तसेच त्याला घेऊन देवासमोर आले. त्या महारोग्याला सांगितले, ''इथे नदीमध्ये स्नान कर. नवीन वस्त्रे घे. कांही रोग राहिला नाही याची खात्री करून घे. आता बरा झालास ना? मग देवाला नमस्कार करून आत्ताच्या आत्ता वाडी सोडून तुझ्या गांवी जा. जर सूर्योदयानंतर या गांवात राहिलास तर पुन्हा पूर्वीसारखे तुझे शरीर (रोगग्रस्त) होईल.''

त्याला काय, ह्यांचा राग कशाकरता. हे कोणावर रागावलेत कांहीच कल्पना नाही.''जातो महाराज'' असे म्हणून देवाला नमस्कार करून तो निघून गेला. नारायणस्वामीमहाराज वर मठात आले. दंडाला परशुमुद्रा बांधली. प्रवासाची तयारी केली. आणखी खाली जाऊन देवाला नमस्कार करून निघायचे आता. काकड आरतीला अजून अवकाश होता. कोणी जागे नव्हते. पादुकांसमोर

उभे राहिल्यावर आंतून आवाज आला.
''काय स्वामी महाराज, आत्ता प्रवासाची तयारी?''
''होय, तुम्हाला आमचा कंटाळा आलाय मग कशाला राहायचे इथे''
''तुमचा कंटाळा आला? कोणी सांगितले तुम्हाला?''
महाराजांनी बाहेर येऊन नारायण स्वामींचा दंड धरून म्हणाले.
''तुमचा आम्हाला कंटाळा कसा येईल? तुम्ही इथे आमच्या जवळ राहा''''ब्राह्मणाला कोणी सांगितले, की माझ्याबरोबर स्नान केले असता रोग जाईल म्हणून? तुमच्याबरोबर स्नान करून रोगमुक्त होऊन तो गेलेला आहे. माझा त्याच्याशी कांहीही संबंध नाही. तो आता गांवामध्ये सांगत हिंडणार नारायणस्वामींच्या बरोबर स्नान करून मी बरा झालो. एवढ्याकरता मला तुमच्या इथे राहायचे नाही.'' दत्तप्रभू म्हणाले,''स्वामी महाराज, लोक संग्रह करायला नको का? लोकांचा उद्धार कोणी करायचा? लोकांवर कृपा कोणी करायची? त्यांचे कल्याण कोणी करायचे?'' नारायणस्वामीही चतुर होते ते म्हणाले,''सर्व विश्व ज्याने निर्माण केले. ज्याला विश्वाची काळजी आहे त्याने लोकांचा उद्धार करावा. आम्ही नाही. आमच्याकडे हे काम नाहीये. अनेक जन्म प्रारब्ध, प्रारब्ध म्हणून अनेक सुख दु:ख भोगत या जन्मात आपलं दर्शन झालं. आपल्या ध्यानानंदामध्ये अखंड निमग्न राहाणारे आम्ही पुन्हा या प्रारब्धात पडावं अशी आपली इच्छा आहे महाराज. आपण कोणाचाही उद्धार कोणाकडूनही करू शकता.'' महाराज म्हणाले,''बरं, जा बाबा. आम्ही आता तुमच्या वाट्याला जाणार नाही.'' असं दत्तप्रभूंकडून कबूल

करून घेतल्यावर महाराज संगमावर स्नानाला गेले. स्नान करून या ठिकाणी येऊन ध्यानमग्न झाले. अखंड ध्यान चालू राहावं म्हणून ईश्वराबरोबरसुद्धा भांडण केलं त्यांनी. पराभक्ती याला म्हणतात.

सद्‌गुरूवासुदेवानंदसरस्वती स्वामी महाराज चा एक अभंग प्रसिद्ध आहे –

***मित्र मित्र जरी भांडती***
***तरी पुन्हा एक होती***

खरं भांडण नसतं म्हणाले. खरे जे मित्र आहेत त्यांच प्रसंगाने भांडण झालं. मतभेद झाला पण पुन्हा एक आहेत. दुसरे उदाहरण देताहेत –

***दंपतीचा हो कलह***
***लवमात्र न तुटे स्नेह***

दंपतीचा कलह झाला, पतीपत्नींचा कलह झाला. भांडण झालं म्हणजे काय राहातं शिल्लक, स्नेहभाव तुटत नाही. प्रेम अखंड आहे.

***देवभक्ताचे ते भांडणे।***
***पराभक्तीचे ते ठाणे।***
***वासु म्हणे हा विनोद।***
***देतो दत्ता परानंद।***

नारायणस्वामींनी दत्तप्रभूंची क्षमा मागितली. ''चुकलो महाराज, काशीक्षेत्रामध्ये असताना कोणा बरोबर वादविवाद करणार नाही असे गुरूमहाराजांना वचन दिले होते. त्याचा विसर पडला. आपण क्षमा करा.''

दत्तप्रभूही म्हणाले,''आम्ही आता तुमच्या वाटेला जाणार नाही. बाबा. आम्हाला काय माहीती. तो बिचारा ब्राह्मण इथे आला होता. दु:खी झाला होता; त्याचा रोग बरा व्हावा म्हणून तुमच्याकडे पाठिवले.''

नारायणस्वामी म्हणाले,''माझ्याकडे पाठवून काय उपयोग? आपल्या जवळच येऊन तो बरा होऊन गेला'' तर कृतार्थता उत्पन्न झाली. ईश्वर साक्षात्कार झाला. समाधी अवस्था सिद्ध झाली अशा वेळेला निर्मोह अंत:करण कसं असतं याचं उदाहरण आहे. दत्तप्रभूंची इच्छा आहे कांही हरकत नाही. देवांची आज्ञा आहे. नाही ! ही आज्ञा नाहीये आणि हा आम्हाला मान्य नाही. अशा पूर्ण निश्चिंत अवस्थेलाच निर्मोह अवस्था म्हणतात. यश नको, धन नको, मोह बिल्कुल नाही. कशाचीही इच्छा नाही.

***निर्मानमोहा जितसंगदोषाअध्यात्मनित्या विनिवृत्तकामा:।***
***द्वन्द्वैर्विमुक्ता: सुखदु:खसंज्ञैर्गच्छन्त्यमूढा: पदमव्ययं तत्॥१५.५॥***

मोहरहित झालेले महात्मे इतक्या दैवी गुणांनी संपन्न होतात. ईश्वराच्या कृपेने आणखी ईश्वर साक्षात्कार करून घेऊन मुक्त होतात.

***मया जातमात्रेण संमोहितेन् गृहीतं कदाचिन्न ते नाम दत्त।***
***क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं प्रभो क्लिन्नचित्त॥***

जन्माला आल्यानंतर मोह उत्पन्न होणं. मध्ये मोह निर्माण होणं. आणि तो लगेच दूर होण्याकरता ईश्वराची योजनाही होणं हे एखाद्याच सुकृतसंपन्न पुण्यशील महात्म्याच्या बाबतीत घडून येतं. त्याचा मोह दूर होतो. तो याच जन्मामध्ये मुक्त होतो. अनेक जन्मांचे

सुकृत उदयाला आले म्हणजे या प्रमाणे घडते.

गर्भावस्थेमध्ये नामस्मरण होत नाही. घडलं नाही. गर्भवासात कसं घडेल हो? किती कष्ट असतात? मग प्रल्हादाला गर्भावासामध्ये ज्ञान कसं झालं? याचं उत्तर कांही देता येणार नाही म्हणजे सुकृतच तसं तुमचं नाही पापच करून आलात. पापामुळे गर्भवास घडला. कष्ट भोगावे लागले आणि ईश्वराचे नामही घेतले गेले नाही. जीवाचाच दोष आहे. जीवांचीच कर्म आहेत. त्या कर्मांमुळे जीवांना दु:ख भोगावे लागले. ईश्वराची उपासना घडणं न घडणं हे सर्वही पूर्व सुकृतावर अवलंबून आहे. पुढच्या श्लोकात महाराज सांगताहेत बाल्यावस्थेतही माझ्या हातून नामस्मरण घडले नाही. बाल्यावस्थेत मी आपले नामस्मरण करू शकलो नाही. खेळामध्येच बालवय गेले. तारुण्य भोगासक्तीत गेले. विषय भोगाकडेच सगळे लक्ष होते. आता वृद्धावस्था प्राप्त झाली. या अवस्थेत सगळ्या इंद्रियांच्या शक्ती कमी झालेल्या आहेत. भीष्माचार्यांचे वय दिडशे पावणे दोनशे होते म्हणतात. अर्जुनाच्या बाणांनी सर्व शरीर भरून गेले. पण त्याही अवस्थेत ते दोन महिने पडून होते. उत्तरायण लागल्यावर त्यांना देह सोडायचा होता. इच्छा मरणी होते ते.

श्रीकृष्ण परमात्मा समोर उभे आहेत. मृत्युच्या वेळेस भगवंतांचे दर्शन घडते आहे केवढे भाग्य आहे ! पण त्या दर्शनाने अंत:करण स्थिर झालेले आहे. आणि अशा स्थितीत श्रीकृष्णांच्या आज्ञेने त्यांनी धर्मराजासारख्या जिज्ञासू, धर्मशील पुरूषाला उपदेश केला. नंतर बोलणे बंद केले. ईश्वराच्या इच्छेने सर्व व्यथा दूर झाल्या. कोणच्याही इंद्रियामध्ये भ्रम नाहीये. सगळी इंद्रिये सावध आहेत.

इथे तो भक्त म्हणतो. वृद्धावस्थेत इंद्रिये ताब्यात नसल्याने मी आपले नाम घेऊ शकलो नाही. हा माझा अपराध झाला.

भीष्माचार्यांची सगळी इंद्रिये सावध आहेत. भगवान श्रीकृष्णांकडे दृष्टी लागलेली आहे आणि वाणीने स्तुती करता करता त्यांनी आपले प्राण भगवंताच्यांत विलीन केलेले आहेत. काय योग्यता आहे !

***क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं प्रभो क्लिन्नचित्त।***

***हृषीकेश मे वाङ्मन:कायजातं हरे ज्ञानतोऽज्ञानतो विश्वसाक्षिन्।***
***क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं प्रभो क्लिन्नचित्त॥***

मानवजन्मामध्ये, देवयोनीमध्ये, पशुपक्षांच्या जन्मामध्ये, गर्भावासात नामस्मरण घडले नाही हा अपराध आहे असे महाराज सांगताहेत. बोलणे चालणे इतर सर्व व्यवहार व्यवस्थित चालू होते माझे पण नामस्मरण इतके सोपे साधन माझ्या हातून घडले नाही असे महाराज म्हणताहेत. हा मोठा अपराध झालेला आहे. काया, वाचा, मन ही तीन साधने देवाने दिली असताना प्रार्थना, उपासना वगैरे कांही माझ्याकडून व्हायला पाहिजे की नाही पण या तीन साधनांच्या कडूनही अनेक अपराध घडले आहेत. वाणी चांगली राहिली नाही. मन चांगले राहिले नाही आणि शरीरही व्यवस्थित वागले नाही. ज्ञानता, अज्ञानता दोन्ही कारणांनी बुद्धीपूर्वकही या तीन साधनांकडून अपराध झाले आहेत. त्या बद्दल क्षमा मागितली आहे.

***स्मृतो ध्यात आवाहितोऽस्यर्चितो वा न गीत: स्तुतो वंदितो वा न जप्त:।***
***क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं प्रभो क्लिन्नचित्त॥***

आपल्याला अनेक प्रकारे ईश्वराची सेवा करता येते. भगवंताचे नुसते स्मरण केले तरी अनेक दोष दूर होतात. स्मरण मनाने करायचे आहे. आपल्या गांवी (इथून वाडीहून) परत गेल्यावर इथल्या मनोहर पादुकांचे स्मरण केले तरीसुद्धा दोष दूर होतात. गुरूंच्या बद्दल विचारांच्यात मन निमग्न झाले म्हणजे ते दुसरीकडे कुठे जात नाही. भगवंताचे अखंड स्मरण म्हणजे ध्यान आहे. पण तेही माझ्याकडून झाले नाही. परमात्म्याचे स्मरण करून आव्हान करणेही माझ्याकडून झाले नाही.

आवाहन झाल्यानंतर अर्चनाला सुरवात होते. अर्चनाचेही प्रकार आहेत. शरीराने अर्चन करणे, षोडषोपचार आहेत. वाणीने स्तोत्रपठण इ. करणे, मनानेही अर्चन, पूजन करणे. त्रिविध पूजा करणे. पण यातले कांहीच माझ्या हातून घडले नाही. वाणीने गायनसेवा घडली नाही. त्याच्यानंतर महाराज वंदनभक्ती पंढरीची वारी सुरू करून दिली. त्या वारीमध्ये जाणारे येणारे एकमेकांना पाहिल्या बरोबर एकमेकांच्या पायावर डोके ठेवतात.

***पंढरीच्या जना नाही अभिमान ।***
***करती नमन एकमेका।***

म्हणतात.

संतांनी वंदन भक्ती सांगून ठेवली. पूजेच्या वेळी देवाला द्यायला इतर कांही उपचार नसले म्हणजे 'सर्वोपचारार्थे अक्षतां समर्पयामि' म्हणतात किंवा 'नमस्कारं समर्पयामि' असेही म्हणतात. नमस्काराने पूर्णता होते. पण ती वंदनभक्तीही माझ्याकडून घडली नाही. देवाला मी नमस्कारही केला नाही. मंत्र जप, पुरश्चरण वगैरे शास्त्राने करायला सांगितले आहे. त्यामुळे ईश्वरी साक्षात्कार होतो

पण माझ्याकडून तेही घडले नाही. मनाने ध्यान, स्मरण घडले नाही, वाणीने जप, नामस्मरण झाले नाही, शरीराने वंदन घडले नाही. मनुष्यजन्म मिळाला. ही सगळी साधने मिळाली पण यांचा मी आपल्या उपासनेकरता कांहीही उपयोग करु शकलो नाही. म्हणून शेवटी प्रार्थना आहे –

***दयाब्धिर्भवादृङ्न सागाश्च मादृग् भवत्यास्ममंतोर्भवान्मेशरण्यः।***
***यथालंबनं भूर्हि भूनिः सृतांघ्रेरिति प्रार्थितं दत्तशिष्येण सारम्॥***

सर्व दत्तशिष्यांनी अशी प्रार्थना करावी असा महाराज उपदेश करताहेत. भगवान दयाब्धि आहेत. म्हणून त्यांच्या जवळ आपल्या अपराधाची क्षमा करण्याची प्रार्थना करायची. ज्याची प्रार्थना करायची तो निर्दय असेल तर त्याला दया यायचीच नाही. ''माझ्याकडे येऊ नकोस, चालता हो'' असे त्याने म्हटले तर काय करायचे? तर ही जाणीव पाहिजे की भगवान दयेचा सागर आहेत. त्याची दया कधीही संपत नाही.

किती काळ गेलेला आहे ! सृष्टीच्या निर्मीतीपासून कार्य चाललेले आहे. अनेक अपराधी भक्त येत असतील, क्षमा मागत असतील. त्यांच्यावर दया करून त्यांना मुक्तही केले जात असेल. व्यवहारामध्येसुद्धा सर्वोच्च न्यायालयाने ज्याला फांशीची शिक्षा दिली त्याने अर्ज केल्यानंतर राष्ट्रपतींना जर दया आली तर त्याची फांशीची शिक्षासुद्धा माफ होते. हे आपण पहातो. ईश्वराजवळ तर किती दया आहे ! पूर्ण शक्ती आहे. जो जीव आपल्या हातून पापं घडल्याची कबूली देतो त्याची पापं कशाला ठेवायची? असा तो विचार करतो. त्याच्या दयेमुळे अनेक जन्मांच्या पातकांचा नाश होऊन जातो. म्हणून

*दयाब्धिर्भवादृङ न सागाश्च मादृग् भवत्याप्तमंतोर्भवान्मेशरण्य:।*
*यथालंबनं भूर्हि भूनि: सृतांघ्रेरिति प्राथितं दत्तशिष्येण सारम्॥*
ही प्रार्थना रोज केली पाहिजे.

माझ्या हातून अनंत अपराध अहर्निश घडत असतात. माझ्यासारखा अपराधी कोणी नाही आणि आपल्या सारखा दयासागर नाही. अपराध करण्याकडेच माझी प्रवृत्ती आहे. थोडीसुद्धा दैवी संपत्ती मला मिळवता आली नाही. चालता चालता पडल्यावर आधार कोणाचा? भूमीचाच.

आमच्या शक्तीबद्दल एक विलक्षण अभिमान आमच्या अंत:करणात असतो. मला बुद्धीशक्ती आहे. मला सर्व समजते. अशा अभिमानाने आमचे ईश्वराकडे दुर्लक्ष होते. त्यामुळे ईश्वराचे नामस्मरण नाही. ध्यान नाही. पूजन नाही. वंदन नाही. कांही नाही. फक्त अहंकार तेवढा आहे.

*दयाब्धिर्भवादृङ न सागाश्च मादृग् भवत्याप्तमंतोर्भवान्मेशरण्य:।*
*यथालंबनं भूर्हि भूनि: सृतांघ्रेरिति प्राथितं दत्तशिष्येण सारम्॥*
ही वृत्ती झाली म्हणजे अहंकार गेला असे समजायला हरकत नाही. आपल्यासारखा दयासागर कोणी नाही आणि माझ्यासारखा अपराध करणारा कोणी नाही. आपण क्षमा केली तरी माझ्याकडून अपराध होतच राहातात. माझं सगळच सदोष आहे. शरीर सदोष आहे. वाणी सदोष आहे. मन, बुद्धी सदोष आहे. रागद्वेषादिक विकार मनामध्ये आहेत. आणि हे विकार मनामध्ये असताना अपराध घडणार नाहीत असे कसे? अपराध घडल्यानंतर क्षमा मागायची परंतु पुन्हा अपराध होणारच नाहीत असे कांही सांगता येत नाही. अपराध न होण्याकरता मन शुद्ध, निर्विकार झाले

पाहिजे. *'भवान्मेशरण्यः ........'* म्हणताहेत. रक्षण करणारे आपणच आहात. माझे रक्षण आपल्यावांचून कोणीही करणार नाही व्यवहारामध्ये पूर्ण रक्षण करायला कोणीही समर्थ नाही. कोणाचीही इतकी शक्ती नाही.

इंद्रादिक देवांच्याजवळही शक्ती नाही. देवेंद्राकडून कर्णाला शक्ती मिळाली अर्जुनाला मारण्याकरता त्याने ती मिळवली होती. पण त्या शक्तीपासून भगवंतांनीच अर्जुनाचे संरक्षण केले. त्या शक्तीचा उपयोग घटोत्कचाचा नाश करण्याकरता झाला. इथे रक्षण करणारा कोण आहे?

***भवान्मेशरण्यः .....***

हा पूर्ण विश्वास मनामध्ये पाहिजे. आपले कांहीही कर्तृत्व नाही अशी निरभिमान वृत्ती झाली पाहिजे. आपण दयासागर आहात म्हणून ही प्रार्थना आहे. आपल्या अंतःकरणामध्ये सर्वांबद्दल प्रेम भावना आहे. आपण सर्व जीवांचा उद्धार करणारे आहात.म्हणून या स्तोत्रामध्ये जीवाकडून घडणारे सर्वही दोष दाखवून त्या दोषांपासून मुक्त होण्यासाठी क्षमायाचना केली आहे.

**।। अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ।।**

*(श्रीक्षेत्र वाडी येथे गुरुद्वादशी (१९९४)निमित्त स्वारी समोर झालेल्या पुराणसेवेचा सारांश चि. सूरज तांबोळीच्या सौजन्याने)*

***आश्वास्यांनां प्रव्रजन्नग्रजान्य:***
***कृत्वा स्वंगान् संचचारार्यमान्य:।***
***विस्मृत्यास्मान् किं स गाढं निदद्रौ***
***श्रीपादद्रौ वापदाहानिदद्रौ॥***

प.पू. श्रीवासुदेवानंदसरस्वती महाराजांनी श्रीपाद श्रीवल्लभांचे हे स्तोत्र केलेले आहे. दत्तप्रभूंनी जे दोन अवतार कलीयुगात भक्तोद्धारासाठी घेतले त्या पैकी हा पहिला अवतार आहे. या स्तोत्रात भक्त देवाची आठवण करतो आहे की अजून आपली कृपा आमच्यावर कां होत नाही? आपल्याला माझा विसर पडला काय? का प्रभू आपल्याला झोप लागली आहे? गाढ झोप लागल्यामुळे आपल्याला माझी हांक ऐकू येत नाही काय? वास्तविक ईश्वराला झोप नाही आहे. तो निर्गुण निराकार असल्यामुळे सर्व दोषांपासून मुक्त आहे. झोप वगैरे सर्व विकार जीवाला आहेत. ईश्वराला ते नाहीत. ज्ञानी मनुष्य आणि ईश्वर हे सदैव जागृत असतात. ते ज्या गोष्टीच्या ठिकाणी जागृत असतात त्या आत्मस्वरुपाच्या ठिकाणी सर्व सामान्य अज्ञानी जीव हे झोपलेले असतात. आणि संसाराच्या ठिकाणी जिथे हे सर्व जीव जागे असतात म्हणजेच अडकलेले असतात. तिथे ज्ञानी पुरुष आणि ईश्वर हे सदैव झोपलेले असतात. त्यांच्या दृष्टीने संसार नाहीच आहे.

तर ती सुमती जी होती तिचा पुत्र होण्याचं दत्तप्रभूंनी मान्य केलं. आणि त्या प्रमाणें तिला पुत्र झाला. श्रीपाद नांव ठेवलं त्या मुलाचं. श्रीपाद श्रीवल्लभ मोठे होऊ लागले. १५-१६ वर्षांचे

झाल्यावर सहाजिकच आईबापांच्या मनांत मुलाचे लग्न करावे असे आले. पण श्रीपादवल्लभांनी साफ नकार दिला. मी संन्यास घेणार आहे. म्हणून सांगितले. पूर्वीची आठवण करुन दिली. पुत्र होईन असे सांगितले होते पण त्याच वेळी त्याच्या मनाविरुद्ध वागू नका हेही सांगून ठेवले. तिने क्रम–संन्यास घ्या वगैरे सांगून पाहिले. ब्रह्मचर्याश्रमानंतर गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम आणि नंतर संन्यास घ्यावा. असे शास्त्र आहे. हे म्हणाले शास्त्राने कधीही कुठल्याही आश्रमातून संन्यास घेता येतो असही सांगितल आहे. शास्त्र हे ज्ञापक आहे. ते नुसतं मार्गदर्शन करतं. असं करा म्हणून सांगत नाही. प्रत्येकाने स्वत:च्या मनांत परिक्षण करावं आणि आपण कुठल्या पायरीवर आहोत हे ठरवावे.

भगवान संन्यास घेणार हे कळल्यावर तिला अतिशय दु:ख झाले. आपल्या दोन मुलांची आठवण झाली. इतके दिवस कां झाले नाही दु:ख? त्या मुलांची आठवणही झाली नाही. स्वत: भगवान पुत्र होऊन आले. त्यांच्या सान्निध्यामुळे दु:ख वगैरे सर्व विसरली होती ती. अतिशय आनंद तिला मिळत होता. भगवंताच्या सहवासाचे हे सामर्थ्य आहे की सगळा संसार ती विसरून गेली. पण अशा भगवंताचा वियोग होणार हे कळल्यावर ते संसारातले सगळे दु:ख आठवले तिला. भगवंताचे चरण तर अंतरणारच आणि वर त्या दोन मुलांकडेच शेवटपर्यंत पहावे लागणार. पंगु आणि अंध होते ते. आता हिलाच त्यांना सांभाळावं लागणार. हे सर्व तिला आठवलं. आणि तिनं प्रार्थना केली श्रीपादश्रीवल्लभांना. त्यांनाही दया आली तिची. त्यांनीही आईची आज्ञा म्हणून, ती पंगु आणि अंध जी मुलं होती त्यांचं व्यंग दूर केलं. नुसतं व्यंग दूर केलं असं

नाही तर शास्त्राचं ज्ञानही पुष्कळसं त्यांना झालेलं आहे. इथे प्रारब्ध वगैरे कांही नाही. म्हणजे ईश्वर प्रारब्ध बदलू शकतो हे जे संत महात्मे सांगतात ते खरं आहे. कुठल्या कर्माचे फळ कधी व किती द्यायचे हे त्याला माहीत आहे. तो शक्तिमान आहे. बरं. नुसती दया नाहीये. दु:ख दिसले. वाईट वाटले. दया उत्पन्न झाली असे नाही ते दु:ख दूर करण्याची पूर्ण शक्ती आहे. प्रारब्ध आहे तुझे. असे म्हणाले नाही ते. त्या आईमुळे मुलांचे प्रारब्ध दूर झाले म्हणा किंवा ते संपायची वेळ आली होती म्हणा. इथे कर्म कोणाचे आणि फल कोणाला मिळाले. त्या आईच्या सेवेचेच फल त्या मुलांना मिळाले. पण तिला मिळाले नाही असे म्हणता येणार नाही. कारण प्रत्येक आई-वडिलांना आपला पुत्र सुखी व्हावा असं वाटतच. म्हणजे ते फल तिलाही मिळालेले आहे.

तर या सुमतीमुळे भगवंताचा हा अवतार झालेला आहे. ''परित्राणाय साधुनां.....'' ही जरी प्रतिज्ञा असली आणि तो जरी त्यासाठी अवतार घेत असला तरी त्याला त्या प्रमाणे अवतार घ्यायला लावणे ही जीवाची शक्ती आहे. म्हणून ही सुमती आणि नंतर ती अंबा या दोघींचेही उपकार आहेत आपल्यावर ज्यांच्यामुळे हे दोन अवतार झाले आणि भक्तांचा उद्धार झालेला आहे.

**॥ अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ॥**

*मालाकमंडलुरध: करपद्मयुग्मे ।*
*मध्यस्थपाणियुगुले डमरुत्रिशूले ।*
*यस्यस्त ऊर्ध्वकरयो: शुभशंखचक्रे ।*
*वंदेतमत्रिवरदं भुजषट्कयुक्तम् ॥*

*श्री गणेशाय नम: । श्रीगुरुचरणार विंदाभ्यां नम:।*

*राज्यं योऽ दादाशु निर्णेजकाय प्रीतो*
*नात्या य: स्वगुप्त्यै नृकाय:।*
*विस्मृत्यास्मान किं स गाढं निदद्रौ*
*श्रीपादद्रौ वापदाहानिदद्रौ॥४॥*

भगवान श्रीपादश्रीवल्लभ स्वामी महाराजांनी कोणा कोणावर कृपा केली; प्रारब्ध कर्मामध्ये सांपडलेले जीव; त्या प्रारब्ध कर्मातून कुणाकुणाची सुटका केली ते या चरित्रात सांगितले आहे.

कुरवपूर क्षेत्रामध्ये महाराजांचा मुक्काम होता. अनेक मंडळी दर्शनाकरता यायची. सत्संगती त्यांना घडत असे. मार्गदर्शन त्यांना घडत असे. त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे आचरण करून सर्वही जीव कृतार्थ होत होते. त्या गावात राहाणारा परीट धुणे धुण्याकरता म्हणून नदीवर यायचा. नदी तीरावर महाराज आश्रमामध्ये राहिलेले होते. त्या परीटाचे पूर्व सुकृत चांगले होते. महाराजांच्या विषयी त्याच्या अंत:करणामध्ये अत्यंत भक्ती उत्पन्न झाली. सकाम असो अगर निष्काम असो. भगवत्प्रेम चित्तामध्ये असले म्हणजे झाले. सकाम भक्तीच उलट चांगली म्हणायला हरकत नाही. आपली इच्छा पूर्ण करण्याची शक्ती परमेश्वराच्या ठिकाणी आहे ही भावना असल्याशिवाय सकाम भक्ती निर्माण होत नाही.

त्या परीटाने महाराजांच्या दर्शनाकरता जावं. दर्शन करावं.

बसावं. त्यांच्या आश्रमाची झाडलोट करावी. सेवा करावी. कोण काय बोलतयं. महाराज काय सांगतात ते ऐकावं. असा त्याचा क्रम रोज चालू होता. रोज दर्शन करून जायचे. एके दिवशी तो आलेला असताना महाराज त्याला म्हणाले,''का रे बाबा. कशाकरता येतोस तूं? तूं राज्य करेनास.'' श्रेष्ठ पुरुषांची वाणी जशी निघेल त्या प्रमाणे घडत असते. ''राज्य करायचयं तुला. कर.'' म्हणाले. तो म्हणाला,''कुठल राज्य? मी रंक आहे. राजा शक्य नाही.'' सहज बोलले. कांही दिवस गेलेले आहेत. त्याने नित्य आणखी धुणं धुवावं. महाराजांची यथाशक्ती सेवा करावी. आणि धुणं धुवून गावांमध्ये यावं. ही त्याची शक्ती महाराजांना पसंत पडली.

एके दिवशी तो असाच दर्शनाकरता आलेला असताना एक मोठा राजा, त्याचे सैन्य, स्त्रिया सर्व परिवार घेऊन नांवेतून योगायोगाने कृष्णा नदीत तिथे आला. हा रजक स्वामी महाराजांच्या पुढे दर्शनाकरता उभा होता. त्याचे लक्ष तिकडे गेले. चित्ताला मोह उत्पन्न करणारे जे विषय आहेत त्या विषयांपासून चित्त बाजूला झाले पाहिजे. वासना! अंत:करणामध्ये उत्पन्न होऊन उपयोग नाही. पण अनंत जन्मांचा अभ्यास असल्याने वाटते हे पाहिजे, ते पाहिजे. त्या वासना कितीही जन्म गेले तरी उत्तरोत्तर कमी न होता वाढतच जातात.

राजाचे ऐश्वर्य आहे ते. किती स्त्रिया आहेत. दागदागिने अंगावर आहेत. वेगळ्या वेगळ्या रंगाची वस्त्र परिधान केली आहेत. हे सगळे त्या रजकाने पाहिले. तो महाराजांच्या समोर दर्शनाला उभा होता इतक्या जवळून महाराजांचे सान्निध्य लाभले होते पण मनात मात्र राजाबद्दल विचार चाललेले होते. विषय शब्दाचा अर्थच असा आहे – विबनवत्नि अनुबन्धन्ति – जीवाला बांधून ठेवणारे म्हणून

त्यांना विषय म्हणतात. त्यांच्या ठिकाणी जीवाला जखडून टाकतात. तर ते ऐश्वर्य आहे. किती स्त्रिया आहेत. किती अलंकार आहेत. किती सैन्य आहे ! खरा भाग्यवान् आहे. देवाची मोठी कृपा याच्यावर असली पाहिजे. म्हणजे असे ऐश्वर्य मिळाले म्हणजेच देवाची कृपा आहे. हीच भावना आहे. अज्ञानी होता तो !

महाराजांनी एकदम त्याला विचारले,''काय रे, काय विचार चाललाय मनामध्ये?'' तो एकदम चमकला. म्हणाला,''तुला राजा व्हायचयं काय?'' आता काय सांगणार? इच्छा तर आहे.ते राजाचे ऐश्वर्य पाहून त्या वासना मनामध्ये राहतील नाही तर काय? पण प्रत्यक्षात म्हणाला,''नाही. महाराज. आपण मला दूर लोटू नका. आत्तापर्यंत मी आपल्यापासून दूर राहिलेलोच आहे. असे अनेक जन्म गेले. आणि याही जन्मांत जर मी आपल्यापासून दूर झालो तर पुन्हा काही हा मनुष्य जन्म मला मिळणार नाही. आपलं दर्शन होणार नाही.''

''नको काय? तोंडाने नुसते नको म्हणले की झालं काय? मनात तुझ्या वासना आहेत ते ऐश्वर्य पाहिजे. ऐश्वर्याच्या इच्छेने ईश्वराची भक्ती करणारा हा राजस भक्त आहे. सात्विक नाही. हे विषयभोग घेतल्याशिवाय मनांतल्या वासना जाणार नाहीत. तूं राजा हो. सगळे विषय तुला मिळतील.'' तो म्हणाला. ''नको. महाराज. आपल्या दर्शनाला मी अंतरेन. चूक झाली माझी.'' महाराज त्याला म्हणाले,''अरे पण तुझ्या वासना गेल्याशिवाय तुला मोक्ष कसा मिळेल? वासना क्षय झाल्याशिवाय मोक्ष नाही.

सकाम भक्ती हीसुद्धा चांगली आहे. असे मोठ्या महाराजांनी एका स्तोत्रामध्ये लिहिलेले आहे.

*धर्मे प्रितीम् सन्मतिं देव भक्तीं । सत्संगाप्ति देहि भुक्तिं च मुक्तिम्।*
*भावासक्तिं चाखिलानंदमूर्ते। घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते॥*

संसारसुख मला पाहिजे. विषयसुख मला पाहिजे. हे देवाजवळ मागा म्हणतात. म्हणजे त्यातून सुटका कशी करायची ही जबाबदारी देवावर पडते. रावणादिक असुरांनी ईश्वराचे अस्तित्व, शक्ती अगोदर मान्य केली. तपश्चर्या केली. पुष्कळ कष्ट केले. देवांपेक्षा असुरांचे कष्ट पुष्कळ आहेत. तपश्चर्या करताना रावणाने आपल्या शरीरातले मांस काढून तंतूवाद्य तयार केले. गायन करून शंकरांना संतुष्ट करून घेतले. परंतू त्याचे कार्य झाल्याबरोबर त्याची बुद्धी पालटली. तो म्हणाला. मी तपश्चर्या केली म्हणून देवाने वर दिला. फुकट दिला काय? म्हणजे या असुरांची देवभक्ती ही तात्पुरती आहे. काम होईपर्यंत टिकते. म्हणून मोठे महाराज म्हणतात संसार. मुक्ती देवाजवळ मागा. तुमची भक्ती सकाम असली तरी चालेल.

श्रीपादवल्लभांनी रजकाला सांगितले,''वासना गेल्या शिवाय मोक्ष मिळणार नाही. म्लेंच्छ वंशात तुझा जन्म होईल.'' त्या वंशात विषयासक्तीच जास्त असते. राजा झाल्या नंतर राजाला काय कमी आहे? तैतरिय उपनिषदाच्या आनंदवल्ली मध्ये असे वर्णन केले आहे की सर्व मनुष्यांमध्ये उत्तम आनंद म्हणजे राजाचा आहे. मानुषानंद ज्याला म्हणतात. पुण्य केल्यामुळे राजवंशात जन्म येतो. मनाला येईल ते घडून येते. मनांतली कोणतीही इच्छा वाणीतून प्रगट झाली की त्याचे पालन होते. अशी शक्ती. असा आनंद राजाला मिळतो. म्हणून मानुषानंद सर्वात मोठा आहे असे म्हणतात. रजक विचार करतोय राजासारखे पुण्य माझे कुठे आहे? निराश झाला. नुसती इच्छा आहे राजा होण्याची. पण भक्तकामकल्पद्रुम

महाराज जवळ आहेत. त्याची इच्छा अपूर्ण कशी राहिल? त्याने काय तपश्चर्या केली होती. काय केले होते?

श्रीपादवल्लभ म्हणाले, ''तूं राजा होशिल. कारण नुसते शाब्दिक नको नको उपयोगी नाही. मनापासून ते नकोसे झाले पाहिजे. तीव्र वैराग्य उत्पन्न झाले पाहिजे. त्या शिवाय मोक्ष नाही. वासनाक्षय होत नाही. सर्वही अनित्य आहे. जगामध्ये कांहीही टिकणारे नाही. हे काय करायचे. अनित्य आहे. विनाशी आहे. कांहीही टिकणार नाही. नित्य फक्त एक परमात्मा आहे. भगवान् श्रीहरी हेच एक नित्य अनंतरूप आहेत. ही बुद्धी ईश्वर प्रसादानेच होते. ही बुद्धी जेव्हां दृढ होईल त्या वेळेला वासना होत नाहीत. कशाला पाहिजेत विषय? विनाशी पदार्थ संग्रह करून उपयोग काय?''

विदूरांनी धृतराष्ट्राला हाच उपदेश केलेला आहे –

***सर्वे क्षयांत्वांचय: पतनांता समुच्चय:।***
***संयोगा: विप्र योगान्ता: मरणान्तंच जीवितम्॥***

''विचार करा. बाबा. तुझ्या मुलांना तुझ्या संमतीने किंवा संमती नसताना राज्य मिळवले. ते किती दिवस राहाणार आहे? कांही दिवसांनी तरी त्याचा नाश होणार ना? राज्य तरी जाईल किंवा राज्य मिळवणारा तरी जाईल. टिकणारे नाही हे. संग्रह जेवढा करावा तेवढा त्याला क्षय आहे. सर्वांपेक्षा अधिक सामर्थ्य मिळाले तरी शेवटी त्याला पतन आहे. जेवढा उंच जाणार तेवढा खाली पडण्याची भीती जास्त. हिरण्यकश्यिपूने केवढी तपश्चर्या केली. किती सामर्थ्य मिळवले पण शेवटी ते टिकले नाही. माझे माझे म्हणून सगळ्यांचा संबंध करायचा आणि शेवटी निघून जायचे. शेवटी वियोगामध्येच त्याचे पर्यवसान आहे. 'मरणान्तंच जीवितम्'.

तर या प्रमाणें महाराजांनी संकल्प पूर्ण केला. या रजकाला संपत्ती द्यायची. कांही हरकत नाही. पोहायला न येणाऱ्या मुलाला पोहोता येणारा मनुष्य सांगतो पाण्यात उडी टाक. तो न येणारा म्हणतो अरे, पण मला पोहोता येत नाही. येणारा म्हणतो. मी इथे आहे. घाबरू नकोस. त्यामुळे तो न येणारा पाण्यात उतरतो. त्याचा विश्वास असतो आपला सोबती आपल्याला बुडू देणार नाही. पण हेच जर तो म्हणाला, मला पोहोता येत नाही, मी पाण्यात जात नाही; तर त्याला कधीच पोहोता येणार नाही. तर श्रीपादवल्लभांचा संकल्प झाला. रजकाला राजा करायचे. रजक म्हणाला, ''आपले दर्शन होणार नाही.'' श्रीपादांनी त्याला आश्वासन देऊन सांगितले, ''होईल. पुढे आम्ही नरसिंहसरस्वतीरूपाने एक अवतार घेणार आहोत. त्या वेळेला तुला आमचे दर्शन होईल.'' अशी त्याच्या वासनाक्षयाची योजनाही केलेली आहे. वस्तुत: वासनाक्षय होत नाही.

***न जातु काम: कामानां उपभोगेन शांम्यति।***
***हविषा तृष्णवर्त्मेव भूय एव अभिवर्ध्यते॥***

अग्नीमध्ये तूप घातल्यावर अग्नी शांत होतो का? जास्तीच वाढणार तो. 'काम' याचा अर्थ 'इदं मेस्यात् इदं मेस्यात् इति इच्छा: काम शब्देण'. हे मला मिळाले पाहिजे. ते मिळाले पाहिजे ह्या ज्या अनेक इच्छा आहेत यालाच 'काम' म्हणतात. आणि ह्या इच्छा पूर्ण होण्याकरता विषयभोग हे साधन नाही. उलट त्या जास्ती वाढतात. ''लाभे लोभाऽभिवर्धते'' कोणी आपल्याला प्रतिबंध केला तर एकदम राग येतो. आपल्या इच्छेप्रमाणे पदार्थ मिळाल्यावर इच्छा थांबायला पाहिजे की नको? इच्छा पेक्षा जास्ती मिळाले पाहिजे असे वाटते. शंभर रूपये मिळताहेत पण हजार रूपयांची

इच्छा होते. हजार मिळायला लागले की पांच हजार मिळावेत असे वाटते. चाललयं. मनाला शांती नाही. लोभामध्येच मन हे जास्ती जास्ती गुंतत चाललयं.

***न जातु काम: कामानां***
***उपभोगेन शांम्यति।***

हा सिद्धांत आहे.

परन्तु रजकावर परमात्म्याचीच कृपा झाली. देवाजवळ जाऊन त्याने राज्य मागितले म्हणा किंवा तशी इच्छा उत्पन्न झाली म्हणा. पण देवाने राज्य दिलेले आहे. परंतु हा वासनेमध्ये गुंतून पडू नये असाही त्यांचा संकल्प आहे.

आता या रजकाला पुढच्या जन्मात आपल्याला कोणी राज्य दिले याची आठवण राहाणार? आपल्याला पूर्व जन्माची आठवण राहिली असती तर ईश्वराबद्दल भक्ती किती वाढली असती सांगता येत नाही. पण संत महात्मे हेच सांगताहेत.''देणे ईश्वराचे'' हे लक्षात ठेवा. तुम्हाला ईश्वर प्रेमाने सत्ता, संपत्ती वगैरे कांहीही मिळत गेले तरी ते देणे ईश्वराचे आहे हे लक्षात ठेवा. ''दाता एक रघुनंदन'' त्याच्या शिवाय कोणी नाही. ही जर आपली भावना दृढ झाली तर कल्याण आहे.

महाराजांच्या संकल्पाने म्हणा रजकाच्या इच्छेने म्हणा त्याला राज्य मिळायचे ठरले. पण त्यातूनही त्याला बाजूला करायची व्यवस्था महाराजांनी त्याच वेळी करून ठेवली. म्हणाले.'' आम्ही आहोत. तूं विसरशील पण आम्हाला तुझे विस्मरण होणार नाही. तुझा उद्धार पुढच्या जन्मात होईल. तुला या जन्मात राजा व्हायचयं की पुढल्या जन्मी?''

रजक म्हणाला,''महाराज आता वयाला साठ, सत्तर वर्षे झाली. आता म्हातारा झालो मी. या म्हातारपणात काय विषयभोग मिळणार? पुढच्या जन्मात राजा झालो तर चांगले'' म्हणजे हा जो सुरवातीला 'नको, नको' कां म्हणत होता ते आता कळले. श्रीपादवल्लभ म्हणाले,''बरं आहे. जा.'' आणि एकदम त्याची हृदयक्रिया बंद पडून त्याचा प्राणनाश झाला. पुढे तो बिदरचा राजा झाला. आता इथे जो राजा येऊन गेला तो बिदरचा होता का कोण होता माहीत नाही. पण एक राजा इथे येऊन गेला. देवांना त्याने दोन गांवे इनाम दिली आहेत. त्याच्या सांगण्याप्रमाणे म्हणा, बरं वाटावं म्हणून म्हणा, खाली देवाजवळ वस्त्रही तशीच घालतात.

तर या प्रमाणे पुढे उत्तम राजवंशात त्याचा जन्म झाला. कारण तो महाराजांच्या जवळ राहिला होता आणि महाराजांच्या कडून त्याने विषयभोग, संसार मागून घेतला होता. सुरवातीला नको, नको म्हणाला पण मग तारूण्यात विषय भोग मिळण्याची इच्छाही कबूल केली त्याने. श्रीपादवल्लभांनी तेही मान्य करून त्याला राज्य दिले.

मोक्षाला या वासना प्रतिबंध करतात. ईश्वर सेवेला वासना प्रतिबंध करतात. वासनांमुळे ईश्वर साक्षात्कार होऊ शकत नाही. विषय वासनेमुळे इंद्रियांच्या द्वाराने मन बाहेर विषयांकडे जाते आणि त्या विषयांचा भोग घेऊन पुन्हा ते विषय मनामध्ये येऊन राहातात. हे बंद केव्हां व्हायचे? मनाने विषयांना सोडायचे का विषयांनी मनाला सोडायचे? हे दोन्ही तर शक्य नाही. त्या वेळेला ब्रह्मदेवांनासुद्धा काय उत्तर द्यावे सुचले नाही. खरंच आहे. मन विषयापासून बाजूला झालं म्हणणं शक्य नाही. अनंत वासनारूपी

मनामध्ये इतके विषय भरलेले असतात की त्यांचा नंबर लागलेला आहे. एक मिळालं की पुन्हा दुसरं. असं सारखं चालू आहे. मन बाहेर जाणारच. बाहेर गेल्यावर ते विषय वासनारूपांनी पुन्हा मनांत येणार. कोणी कोणाला सोडायचे? काय उत्तर देणार? त्या वेळी ब्रह्मदेवांनी भगवंतांचे स्मरण केले म्हणतात आणि भगवान् हंसरूपाने तिथे आले. सनकादिकांना उपदेश केला. ह्या दोघांचा विभाग झाला पाहिजे. मन आणि विषय बाजूला झाले पाहिजेत. याला एक उपाय आहे. सगुण अथवा निर्गुण ईश्वराचे ध्यान करणे, निदिध्यासन करणे. त्या ईश्वराच्या कृपेने जर अशा ईश्वर स्वरूपाच्या ठिकाणी ध्यानाच्या प्रभावाने मन स्थिर झाले तर मन अणि विषय यांचा विभाग होऊन जातो. ते मन आंतच राहाते. बाहेर विषयांकडे जातच नाही. गुळाला चिकटलेल्या मुंगळ्यासारखी स्थिती होते. हे ध्यानाचे महत्त्व आहे. पण ध्यान होणेसुद्धा फार कठीण आहे. मन स्थिर झाले पाहिजे. मनाचे स्थैर्य झाल्याशिवाय सगुणाचेही ध्यान होत नाही. ईश्वराच्या उपासनेचे मुख्य फळ ते सांगितले आहे.

आचार्य महाराजांचे पद्मपादाचार्य म्हणून नरसिंहाची उपासना करणारे एक शिष्य होते. त्यांची इतकी सिद्धी झाली होती की पूजेनंतर नरसिंहांचे ध्यान करता करता नरसिंहरूप ते होऊन जात. देवाची पूजा करताना देवरूप होता आले पाहिजे. म्हणजे इतके मन स्थिर झाले पाहिजे. मग सगुणाचे ध्यान असो की निर्गुणाचे. हा एक उपाय सनकादिकांना भगवंतांनी हंसरूपाने मुद्दाम सांगितला. ध्यानाचे वर्णनही त्यांनी सांगितले. सगुणाचे ध्यान कसे करावे हे ही समजावले. सद्गुरू नारायणस्वामींचाही ध्यानाचा अभ्यास होता. अखंड ध्यान चाललेल असायचे. बाहेर कुठेही लक्ष नसायचे. पण

चमत्कार असा की बंद दाराजवळ बाहेरून लोकांनी मस्तक टेकवून नमस्कार केला की त्यांना 'नारायण' ऐकू यायचे. नारायणस्वामी आंत ध्यानात असताना आशीर्वाद मिळायचा. तर ध्यान हा एक उपाय विषय आणि मन यांचा वियोग करण्याकरता हंसरूपी भगवंतांनी सांगितला आहे.

रजकाला ते कसे समजणार? म्हणून श्रीपादवल्लभांनी त्याला सांगितले. तूं विषयभोग घे. तुझ्या सगळ्या वासना जातील. माझी भेट होऊन तुझे सर्वही कल्याण होईल.'' म्हणजे पुन्हा दर्शन द्यायचे महाराजांनी त्याला आश्वासन दिले. ते महत्त्वाचे आहे. शिष्याने मागून घेतले. आता तुझा माझा संबंध राहिला नाही असे नाही. आपले पूर्ण कल्याण कशाने होणार हे त्याला माहीत नव्हते. राज्य, ऐश्वर्य यातच तो गुंतला होता. पण महाराजांची दया दृष्टी त्याच्यावर होती. पुढच्या जन्मात दर्शन द्यायचे त्याला आश्वासन दिले म्हणजे त्याच्याबरोबर महाराजही जन्म घेणार होते. असे अनेक भक्त असतील. ही अवस्था कोणच्या शक्तीने होते? जगात ज्या अनेक शक्ती आहेत. देव, गंधर्व,अगदी ब्रह्मदेवांनासुद्धा अशी शक्ती नाहीये. जीवाला विषय वासनेमध्ये ठेवून पुन्हा त्यातून बाहेर काढायचा हे फार कठीण आहे. ही खरी पूर्ण कृपा आहे. त्यामुळे महाराजांनी

*राज्यं याऽदादाशु निर्णेजकाय प्रीतो न त्या*
*यः स्वगुप्त्यै नृकायः।*
*विस्मृत्यास्मान् किं स गाढं निदद्रौ*
*श्रीपादद्रौ वापहानिदद्रौ ॥*

**॥ अवधूत चिंतन श्रीगुरूदेव दत्त ॥**

***मालाकमंडलुरध: करपद्मयुग्मे ।***
***मध्यस्थपाणियुगुले डमरुत्रिशूले ।***
***यस्यस्त ऊर्ध्वकरयो: शुभशंखचक्रे ।***
***वंदेतमत्रिवरदं भुजषट्‌कयुक्तम् ॥***

भगवान श्रीपादश्रीवल्लभ महाराज कुरवपूर क्षेत्रामध्ये राहिले होते. अनेक सद्‌भक्त मंडळी यायची. त्यांच्या सर्व कामना महाराजांनी पूर्ण केलेल्या आहेत. वासना पूर्ण झाल्याशिवाय मोक्षाचा अधिकार नाही. त्यामुळे देवाजवळ कांहीही जरी मागितले तरी देवाच्या कृपेने ते प्राप्त होते. वासना शांत होते. अनेक भक्तांचे त्यांनी कार्य केले.

आजच्या आश्विन वद्य द्वादशीच्या दिवशी श्रीपादवल्लभ अदृश्य झाले. लौकिक दृष्ट्या जरी ते अदृश्य झाले असले तरी भक्तोद्धाराचे कार्य अखंड चालू आहे. त्यांच्या स्थानामध्ये आजही अनेक भक्त येताहेत. त्यांच्या इच्छा पूर्ण होताहेत.

नरसिंहसरस्वती स्वामीमहाराज या वाडी क्षेत्रामध्ये बारा वर्षे राहून मग गाणगापूरला गेले. त्यावेळी इथे अरण्य होते. त्यांना पांचशे वर्षांचा काळ होऊन गेलेला आहे. पण ते या ठिकाणीही अदृष्यरूपाने आहेत आणि गाणगापूरमध्येही आहेत. कारण दोन्ही स्थानांमध्ये भक्तांना तसा अनुभव येतोयं. दोन्ही ठिकाणी भक्त येताहेत. त्यांच्या इच्छा पूर्ण होताहेत. कार्य चालू आहे यावरून हे मान्य करावे लागते.

***परित्राणाय साधुनां विनाशाय च दुष्कृताम्***
***धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥***

अर्जुनाला भगवान् म्हणाले, ''प्रत्येक युगात मी अवतार धारण

करतो. कशाकरता? 'परित्राणाय साधुनां' पहिले कार्य आहे. जे सज्जन, धर्मनिष्ठ भगवत् भक्त महात्मे आहेत त्यांचे रक्षण करायचे. त्यांना त्रास होऊ द्यायचा नाही. आणि अशा सज्जनांना विरोध करणारे जे दुर्जन आहेत त्यांचा नाश करायचा. धर्मांची स्थापना जगात करायची हे मुख्य उद्दिष्ट आहे.

श्रीपादवल्लभ कुरवपूर क्षेत्रात अदृश्य झाल्यानंतरची एक कथा सिद्धांनी नामधारकाला सांगितली. एक ब्राह्मण व्यापारी श्रीपादवल्लभांचा भक्त होता. त्याने व्यापार करताना असा संकल्प केला की जर श्रीपादवल्लभांच्या कृपेने मला जर चांगला फायदा झाला तर मी कुरवपूर क्षेत्रात येऊन एक हजार मंडळींना अन्नदान करीन. ईश्वराची प्रार्थना करून संकल्प करून उद्योगाला लागायचे पण प्रयत्न केले आणि त्याना पुष्कळ फायदाही झाला. मग आपल्या संकल्पाप्रमाणें पुष्कळ द्रव्य घेऊन तो कुरवपूरला यायला निघाला. तिथे जाऊन श्रीपादांना नैवैद्य करून अन्नदान करायचे त्याने ठरवले.

ही बातमी कांही चोरांना समजली. ते ह्याच्याजवळ येऊन म्हणाले, "आम्हीही श्रीपादांचे भक्त आहोत. आम्हीसुद्धा कुरवपूरला यात्रेला जात असतो. आम्ही तुमच्या बरोबर येतो." ह्याने विचार केला प्रवासात बरी सोबत मिळेल यांची घेऊ या बरोबर. निघाले ते. ह्याने त्यांच्यावर विश्वास ठेवला. वाटेत एका अरण्यात त्या चोरांनी ह्या ब्राह्मणाला ठार मारले आणि त्याचे सगळे द्रव्य घेऊन ते निघून जाऊ लागले.

ब्राह्मणाचा संकल्प होता कुरवपुरमध्ये जाऊन अन्नदान करायचे. चांगल्या किंवा वाईट कोणत्याही वासना निर्माणच होऊ नयेत म्हणून प्रयत्न केला पाहिजे. पण समजा त्या झाल्याच तर

निदान त्या दृढ होऊ नयेत ह्या साठी तरी प्रयत्न केला पाहिजे. या ब्राह्मणाची अन्नदान करण्याची सद्वासना पक्की झालेली आहे. त्याला जेव्हां चोरांनी मारले तेव्हां 'आपला नवस कांही पूर्ण आता होणार नाही' याचे त्याला वाईट वाटले असणार. मग त्याचा नवस पूर्ण होणार कसा?

कालीदास सांगतात. ईश्वराची इच्छा असेल तर विषाचेही अमृत होईल मीराबाईला विषाची बाधा झाली नाही. तसे इथे श्रीपादवल्लभांना वाटलं. या ब्राह्मणाचा संकल्प पूर्ण करावा. याची इच्छा पूर्ण झाली पाहिजे. ईश्वराला नित्य तृप्त म्हणतात. ह्या व्यापारी भक्ताने नवस केल्याचा श्रीपादांना आनंद झाला. हा आपल्या स्थानात येणार, अन्नदान करणार चांगले आहे. ह्याने केलेल्या पुण्याचे ह्याला फळ मिळेल. तीही योजना ईश्वराने केली आहे. ह्याचा संकल्प पूर्ण झाला पाहिजे असे देवाला वाटलेले आहे.

तर त्या चोरांनी ह्याला मारल्यावर भगवान श्रीपादवल्लभ एकदम त्या ठिकाणी प्रगट झाले. चोरांना ह्यांची काहीच कल्पना नाही. त्यांना वाटले ह्या व्यापाऱ्याला मारून आपण ह्याचा सगळा पैसा घेतला आपल्याला कोण प्रतिबंध करणार? पण हातात त्रिशूळ चक्र वगैरे आयुधे घेतलेले श्रीपाद आहेत त्यांनी त्या चोरांना मारले. श्रीपादांच्या हातून मरण आल्याने चोरही मुक्त झाले. जिवंत राहिले असते तर हेच पाप करीत बसले असते. त्या चोरांपैकी एक जण विचारी होता. तो श्रीपादांना म्हणाला. मी जरी या चोरांबरोबर आलो तरी मला हे त्या ब्राह्मणाला मारतील याची कल्पना नव्हती. यांच्या बरोबर आल्याचा मला पश्चाताप होतोय पण आपण मला क्षमा करा.

श्रीपादांनी त्याला क्षमा करून सांगितले. त्या ब्राह्मणाचे तुटलेले मस्तक पुन्हा धडाला जोड आणि त्याच्यावर हे भस्म टाक. त्या चोराने त्या प्रमाणे केल्यावर तो मृत ब्राह्मण पुन्हा जिवंत झाला. पण श्रीपादवल्लभ अदृष्य झाले. मग त्या चोराने त्या ब्राह्मणाला सर्व घडलेली हकिकत सांगितली. आणि तो त्या ब्राह्मणाबरोबर कुरवपूरला आला. त्या ब्राह्मणाने महाराजांची पूजा केली. पुष्कळ अन्नदान झाले. आपल्याला मिळालेले सर्व द्रव्य असते तर आपण जसे चोरांकरवी मारले गेलो तसे द्रव्यही गेले असते. द्रव्याच्या ठिकाणी ममता ठेवायची म्हणजे आपण चिरंजीव आहोत. या द्रव्याचे मी संरक्षण करू शकतो असे वाटते. पण ह्या ब्राह्मणाची ही सर्व बुद्धी दूर झाली. देणाराही तोच आहे आणि संरक्षण करणाराही तोच आहे. आपल्या कडून सत्कार्य करवून घेणाराही तोच आहे. पूर्वीपासून त्याची भक्ती होती म्हणून तर महाराज आले. प्राण वियोग झालेल्या ब्राह्मणाला त्यांनी जिवंत केले. ही शक्ती ईश्वराशिवाय कोणाची आहे.

ईश्वरस्वरूप झालेले महात्मे सत्यसंकल्प असतात. त्यांच्या संकल्पाप्रमाणें कार्य होते. ईश्वर तर आहेच. तर या प्रमाणें भगवंताच्यावर किती विश्वास पाहिजे ! याचे उदाहरण आहे. चिंता नाही. अन्न संतर्पण करण्यासाठी तो निघाला होता त्यामुळे त्याच्या मनांत लोभ नव्हता द्रव्याचा. आपण जंगलातून जाणार आहोत. आपले कसे होईल याची काळजी नव्हती त्याला. भगवत् भक्त हे निश्चिंत असतात. संरक्षण करणारी ईश्वरशक्ती आहे ही भावना त्यांच्यामध्ये पक्की असल्यामुळे त्यांना भीती वाटत नाही. भीतीचे कारणच काय?

भगवंतांनी संपूर्ण गीता अर्जुनाला सांगितली. ती ऐकायला मारुतिराय ध्वजावर बसले होते. संजयालाही ऐकायला मिळाली. तिघांनी गीता ऐकली. शेवटी संजयाने धृतराष्ट्राला सांगितले, ''महाराज, युद्धात तुमचा विजय होणार नाही.''

***यत्र योगेश्वर: कृष्णो यत्र पार्थो धनुर्धर: ।***
***तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥***

ज्या बाजूला साक्षात् योगेश्वर कृष्ण आहेत याच पक्षाचा विजय निश्चित होणार आहे. पांडवांचे संरक्षण करण्याची श्रीकृष्णांनी प्रतिज्ञा केली आहे. म्हणून तर अर्जुनाची बुद्धी सुधारली. ऐन लढाई सुरु व्हायच्या वेळेस हातातले धनुष्य बाण टाकून स्वस्थ बसून राहिला. मला लढाई करायची नाही. माझ्या हातून पाप होणार आहे. माझ्याच आप्तेष्टांना मी मारणार नाही. हा मोह त्याच्या चित्तात निर्माण झाला होता. विचारशक्ती त्याची निघून गेली होती. त्याचा मोह भगवंतांनी कां दूर केला? कारण त्याच्याकडून सहाय्याची गरज नव्हती. परमात्मा सर्वतोपरी संरक्षण करणारा आहे ही भावना मनामध्ये असली म्हणजे कशाचीच भीती वाटत नाही. चिंता वाटत नाही. म्हणूनच भगवत् भक्त हे निर्भय, निश्चिंत असतात. दैवी संपत्ती पैकी पहिला गुण म्हणजे अभय. सर्व त्रैल्योक्य ज्याच्या ताब्यात आहे अशा पित्याची प्रल्हादाला भीती वाटली नाही. ज्याच्या कोणत्याही आज्ञेचे तत्काल पालन होते असा पिताच प्रल्हादाचा विरोधी होता. प्रल्हाद काय पांच वर्षाचा मुलगा. पण त्याला भीती वाटली नाही.

संतांना भीती वाटत नाही. ते म्हणतात. गर्भावस्थेत आमचे रक्षण कोणी केले? हा संतांचा युक्तीवाद आहे. ते युक्तीनेच सिद्ध

करतात. नुसती भक्ती आहे असे नाही. केवळ श्रद्धा नाही. अंधश्रद्धा नाही. गर्भामध्ये माता तरी मुलाचे संरक्षण करू शकते का? त्या मुलाला गर्भावस्थेत किती वेदना होतात. तिथे सुख आहे का दु:ख याची आईला सुद्धा कल्पना नाहीये. जन्माला आल्यानंतर आईसारखे प्रेम कोणी करू शकत नाही. 'न मातु: परदैवतम्' हे सांगतात. पण त्या मातेच्या गर्भात असलेल्या मुलाचे संरक्षण कोण करते? याचे कांही उत्तर देता येत नाही. बुद्धीवादाला सुद्धा याचे उत्तर सांपडणार नाही. ''आपोआप होते, नैसर्गिक होते'' हे कांही उत्तर नाहीये. निसर्ग म्हणजेच ईश्वर आहे.

संतांची अशी ठाम धारणा आहे की ज्याने माझे गर्भावस्थेत रक्षण केले तो बाहेर रक्षण करायला समर्थ नाही काय? हा विचार त्यांच्या मनामध्ये नेहमी असल्यामुळे ते निर्भय असतात. किती संपत्ती आली आणि किती गेली इकडे त्यांचे लक्ष नसते. या प्रमाणें सर्वही कर्म ईश्वरार्पण बुद्धीने करणारे, भक्ती करून निश्चिंत राहाणारे अशा प्रकारचे भगवत् भक्त यांच्या वरती ही अशी कृपा होते. आम्हाला तसा कांही अनुभव नाही म्हणून ईश्वर नाही असे म्हणून उपयोग नाही. तसे अनुभव येण्याकरता मनाची तयारी पाहिजे.

त्या व्यापाऱ्याने कांही देवाला संरक्षणाला बोलावले नाही. त्याने फक्त फायदा झाला तर श्रीपादांच्या क्षेत्रात जाऊन अन्न संतर्पण करण्याचा संकल्प केला. पण ते सर्वही कार्य आपलेच आहे असे समजून देवाने त्याला पुन्हा जिवंत केला. चोरांना मारले. त्याचा संकल्प त्याच जन्मांत पूर्ण करून घेतला. पुढचा जन्म कशाला?

ज्या संत महात्म्यांना ईश्वरी कृपेचा अधिकाधिक अनुभव

आला त्यांची श्रद्धा, भक्ती वाढते. वृषभदेवांचा पुत्र भरत राजा सर्व संग परित्याग करून अरण्यामध्ये जाऊन भगवत् भक्ती करू लागला. त्याच्या मनांत ईश्वर भक्ती आणखी दृढ उत्पन्न झाली.

ईश्वर सेवा आपण करतो हे सुद्धा विसरून जायला पाहिजे. काय कठीण आहे? मी सेवा करतो. म्हणून ईश्वराने माझ्या सगळ्या इच्छा पूर्ण केल्या पाहिजेत अशी आपण नुसती सत्ता गाजवतो ईश्वरावर. प्रारब्ध कर्म आहे. कर्माप्रमाणें फळ मिळते. ईश्वराचे ऑफिस वेगळे आहे. पण ईश्वराला जो शरण आलेला आहे. भगवत् भक्ती जो करतो आहे, त्याच्याबद्दल मात्र विशेष विचार होतो आहे. त्याचे कर्मफल बदलण्याचीसुद्धा शक्ती आहे ना ईश्वराची ! माहूरपुरातली सती आपल्या पतीला घेऊन गाणगापूरात आली असता तिच्या पतीचे प्राण गेले. पण महाराजांनी (नृसिंहसरस्वती) त्याला जिवंत केला. चिकित्सकांनी विचारले, ''ज्याचा महामृत्यु झालेला आहे तो जिवंत कसा होईल?'' महाराजांनी त्यांना आपण जिवंत केला, असे सांगितले नाही. ते म्हणाले,''ब्रह्मदेवाकडून आम्ही याच्या पुढल्या जन्मांतले कांही आयुष्य मागून घेतले. आणि ते याला दिल्याने हा जिवंत झाला.'' अशी आपली त्या चिकित्सकांची समजूत काढली.

प्रारब्ध बदलणे शक्य नाही असा जरी सिद्धांत असला तरी ईश्वराची शक्ती म्हणून कांही आहे की नाही. म्हणून संत महात्मे ईश्वर भक्तीमध्येच निमग्न झालेले असतात. त्यांना संसार चिंता कांहीही राहिलेली नाही याचे कारण म्हणजे ईश्वराच्या इच्छेने प्रत्येक गोष्ट होते अशी त्यांची ठाम धारणा आहे. आणि मग ते म्हणतात अनुभवाने.

*ठेविले अनंते तैसेचि रहावे।*
*चित्ती असू द्यावे समाधान।।*

गुरुचरित्रामध्ये श्रीपादवल्लभांचे अल्प चरित्र आहे. त्यांच्या चरित्रातला हा प्रसंग ते अदृष्य झाल्या नंतरचा आहे. पुढे नृसिंहसरस्वती महाराज इथून गाणगापूरला गेल्यावर असाच प्रसंग घडला आहे. शिराळच्या ब्राह्मण स्त्रीला नृसिंहसरस्वती महाराजांच्या कृपेने मुले झाली परंतु पुढे त्यांना बालपणातच मृत्यु आला. ती स्त्री आपली मुले गेल्यावर प्राणत्याग करायला निघाली. ती म्हणाली ज्याने माझ्यावर कृपा करून मला मुलगा दिला त्याने आता प्रारब्धाकडे बोट दाखवून कसें चालेल?

*प्रारब्ध प्रमाण म्हणो जरी।*
*तरी कां भजावा श्रीहरि।*

असे तिने ब्रह्मचारी वेषात तिला उपदेश करायला आलेल्या महाराजांनाच विचारले. याचे आधी उत्तर द्या, म्हणाली. आमच्या प्रारब्धाप्रमाणे आम्हाला सुखदु:ख मिळत राहणार. ते टळणार नाही मग ईश्वराची भक्ती कशासाठी करायची? पूर्ण शक्ती आहे ना त्याची ! प्रारब्धाकडे बोट दाखवून तुमच्या कर्माचे तुम्हाला फळ भोगायला पाहिजे असे सांगून ईश्वराला कसे बाजूला होता येईल? ईश्वराची पूर्ण शक्ती आहे ही भावना मनामध्ये धारण करून त्या स्त्रीने महाराजांना तो प्रश्न विचारला. आणि त्यांनी तिला जिथे वर मिळाला तिथे जाण्याला सांगितले. आपणच पादुकारूपाने आहोत हे त्यांनी सांगितले नाही. पुढे त्यांनी तो मुलगा जिवंत केला. त्या वेळेपासून हे क्षेत्र प्रसिद्ध आहे.

मेलेल्या मुलाला जिवंत करणे, तुटलेली मान परत धडाला

जोडून माणूस जिवंत करणे जगात कोणाला शक्य आहे? झोपेतून उठावे तसे हे जीव पुन्हा उठून आपले व्यवहार करू लागले. ही शक्ती फक्त ईश्वराची आहे. नृसिंह सरस्वती स्वामी महाराज अदृश्य आहेत म्हणून ते नाहीत असे या प्रसंगावरून म्हणता येणार नाही. म्हणून सिद्धांनी ह्या दोन्ही कथा मुद्दाम नामधारकाला सांगितल्या.

**॥अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त॥**